दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३०३ I सोमवार १७ ऑगस्ट २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## अप्पर पोलीस आयुक्त संजय जाधव यांना राष्ट्रपती पदक बहाल



**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील नांदगाव शिंगवे येथील रहिवाशी व ठाणे पोलीस अप्पर आयुक्त संजय जाधव यांना उल्लेखनीय व गुणवत्ता पूर्वक सेवेबद्दल राष्ट्रपती पदक बहाल करण्यात आले. जाधव यांनी महाराष्ट्र पोलीस दलामध्ये दिलेल्या दीर्घकालीन व निष्कलंक उत्कृष्ट सेवेची दखल घेउन त्यांची राष्ट्रपती पदकासाठी निवड करण्यात आली. त्यांनी नांदेड, पुणे, मुंबई, कल्याण येथे पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस आयुक्त म्हणून नांव लौकिक मिळविला आहे. जुलै २०२४ मध्ये त्यांनी ठाणे येथील पदभार स्वीकारला आणि २०२५ मध्ये त्यांची पदोन्नती होउन सध्या अपर पोलीस आयुक्त ठाणे येथे कार्यरत आहेत. याआधी त्यांना विविध पुरस्कार मिळालेली आहेत. त्यामध्ये सुरक्षा पदक (२०००), पुण्यभूषण पुरस्कार (२००६), आंतरिक सुरक्षा सेवा पदक बहाल झाली आहेत.राष्ट्रपती पदक बहाल झाल्याबद्दल जाधव यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# घोडेगावात तंबाखूचा साठा; १०.६८ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**शिंगणापूर :** शासनाने प्रतिबंधित केलेल्या सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा व वाहतूक केल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घोडेगाव येथे कारवाई करून ५ लाख ६८ हजार ५१० रुपयांचा तंबाखूजन्य माल आणि सुमारे ५ लाख रुपये किमतीची कार असा एकूण १० लाख ६८ हजार ५१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी दोघांविरुद्ध सोनई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांच्या माहितीनुसार, १४ ऑगस्ट रोजी दुपारी १२.५०च्या सुमारास छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर मार्गावरील घोडेगाव येथील दर्शन किराणा दुकान परिसरात संशयास्पद वाहनाची तपासणी करण्यात आली. एमएच ३२ ए.वाय. ०२६१ क्रमांकाच्या कारमध्ये प्रतिबंधित सुगंधित तंबाखू व विविध तंबाखूजन्य पदार्थांचा मोठा साठा आढळला. पंचनाम्यानुसार जप्त मालाची किंमत ५ लाख ६८ हजार ५१० रुपये आहे.गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस नाईक राहुल डोके यांच्या फिर्यादीवरून यश मनोज नहार (घोडेगाव) व अजित हनुमंत पवार (कुसळम, ता. पाटोदा) यांच्याविरुद्ध गुन्हा क्रमांक ३६४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेतील कलम १२३, २२३, २७४, २७५ व ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक किशोर जाधव करीत आहेत.

दरम्यान, मोठ्या प्रमाणात साठा जप्त झाल्यानंतर प्रतिबंधित तंबाखूच्या पुरवठा-विक्रीची पुढील साखळी तपासली जात आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. कारवाईनंतर 'सेटलमेंट' झाल्याच्या चर्चाही परिसरात सुरू आहेत. मात्र, या चर्चेला कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संपूर्ण पुरवठा साखळी उघड करावी, अशी मागणी होत आहे.

## महत्त्वाचे..

### उपचाराच्या नावाखाली तंत्र-मंत्र करत मौलवीचा महिलेवर अत्याचार

ठाणे : आजार बरा करून देण्याच्या आणि तंत्र-मंत्र आणि जंतर-मंतरच्या नावाखाली ३० वर्षीय महिलेवर जबरदस्तीने अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार भिवंडी शहरातील वऱ्हाळ देवी चौक परिसरातील हजरत सय्यद सुफी कुतुब अब्दाल जलालुद्दीन शाह रहमतुल्लाह दर्गाह येथून समोर आला आहे. या दर्गातील मौलवी मोहम्मद इस्माईल वारीस शेख याच्यावर महिलेने गंभीर आरोप केले आहेत. उपचाराच्या नावाखाली महिलेचे व्हिडिओ कॉलद्वारे चित्रीकरण केल्याचा, तसेच तिच्यावर झालेल्या अत्याचाराचे व्हिडिओ तयार केल्याचा गंभीर आरोप महिलेने केले आहे. हे व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर महिलेने भिवंडी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करत उत्तर प्रदेशला पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या मौलवी मोहम्मद इस्माईल वारीस शेख (५०) याला भायखळा रेल्वे स्थानकातून ताब्यात घेत अटक केली.

# आकारी पडीत शेतकऱ्यांच्या जमिनी मिळणार

## राज्यपालांची मंजुरी मिळेल असा मसुदा तयार करू : विखे पाटील

### २५ ऑगस्टला मंत्रालयात बैठक; शेतकरी संघटनेचे आंदोलन स्थगित

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगाव :** आकारी पडीत शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काच्या जमिनी परत करण्याचा मसुदा तयार करण्यासाठी येत्या २५ ऑगस्ट रोजी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मंत्रालयातील दालनात बैठक आयोजित करण्यात येणार आहे. त्यानंतर हा मसुदा अंतिम मंजुरीसाठी राज्यपालांकडे पाठविण्यात येणार असून, शेतकऱ्यांना जमिनी परत करण्याच्या निर्णयाला राज्यपालांची मंजुरी मिळेल, असा विश्वास जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.



छायाचित्र : बी. आर चेडे व परेश कापसे.

त्यांच्या या आश्वासनानंतर हरिगाव मळा येथे सुरू असलेले अन्नत्याग उपोषण अँड. अजित काळे व शेतकरी आंदोलकांनी स्थगित केले.

हरिगाव मळा शेती महामंडळाच्या नऊ गावांतील आकारी पडीत शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत मिळाव्यात, या मागणीसाठी शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अँड. अजित काळे यांच्या नेतृत्वाखाली महिला व पुरुष शेतकरी १४ ऑगस्टपासून अन्नत्याग उपोषणाला बसले होते. उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी काही आंदोलकांची प्रकृती खालावल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात **(पान ४ वर)**

### कोणतेही साटेलोटे नाही... अकारी पडीत प्रश्नात कोणतेही साटेलोटे नाही

अकारी पडीत जमिनींच्या प्रश्नाचा मला सखोल अभ्यास आहे. या प्रश्नाशी संबंध नसलेल्या व्यक्तींकडून चर्चा होत असल्याने संभ्रम निर्माण होतो. मी महसूल मंत्री असतानाच हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले असून, अँड. अजित काळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही सकारात्मक भूमिका घेतली आहे. कोणतेही साटेलोटे नसून शेतकऱ्यांना न्याय देणे हाच उद्देश आहे. उपोषण रद्द नव्हे, स्थगित करावे; न्याय न मिळाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलनाचा अधिकार कायम आहे.

**-ना. राधाकृष्ण विखे पाटील**

## नागपंचमीला सर्पदंश 'अधिसूचित आजार' घोषित करा : आ. विक्रम पाचपुते

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी नागरिकांना मोठ्या प्रमाणावर भेडसावणाऱ्या सर्पदंशाच्या समस्येवर आता ठोस शासकीय उपाययोजना करण्याची गरज आहे. सर्पदंशाला महाराष्ट्रात 'अधिसूचित आजार' म्हणून घोषित करावे, अशी मागणी आ. विक्रम पाचपुते यांनी राज्य शासनाकडे केली आहे.आ. पाचपुते यांनी ३० जून २०२६ रोजी विधानसभेत हा गंभीर प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सर्पदंशाला अधिसूचित आजार घोषित करण्याबाबत शासन सकारात्मक असून लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. आता नागपंचमीच्या पार्श्वभूमीवर या आश्वासनाची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी पाचपुते यांनी केली आहे.

**नागपंचमीच्या दिवशी निर्णय घेण्याची मागणी**

नागपंचमीच्या दिवशीच सर्पदंशाला अधिसूचित आजार घोषित केल्यास त्याला केवळ प्रशासकीय निर्णयाचे स्वरूप न राहता व्यापक जनजागृतीचा संदेश मिळेल, असे पाचपुते यांनी म्हटले आहे.राज्यात दरवर्षी साधारणतः ५० ते ६० हजार सर्पदंशाच्या घटना अधिकृतरीत्या नोंदवल्या जातात. मात्र ग्रामीण आणि दुर्गम भागातील अनेक घटना आरोग्य यंत्रणेपर्यंत पोहोचत नसल्याने प्रत्यक्ष संख्या यापेक्षा अधिक असण्याची शक्यता आहे.सर्पदंश अधिसूचित आजार झाल्यास प्रत्येक प्रकरणाची अधिक व्यवस्थित आणि अनिवार्य नोंदणी होण्यास मदत होईल. त्यामुळे कोणत्या जिल्ह्यात किंवा भागात सर्पदंशाचे प्रमाण अधिक आहे, कोणत्या कालावधीत घटना वाढतात, उपचारासाठी किती वेळ लागतो आणि मृत्यूचे प्रमाण किती आहे, **(पान ४ वर)**

# उच्च न्यायालयाच्या लिपिक, टंकलेखक परीक्षेत गोंधळ!

### अभिजीत दिपकेंचा आंदोलक विद्यार्थ्यांना पाठिंबा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**संभाजीनगर :** मुंबई उच्च न्यायालयाच्या लिपिक पदाच्या टंकलेखन कौशल्य ऑनलाइन परीक्षेत छत्रपती संभाजीनगरमध्ये गोंधळ झाला. याशिवाय कल्याण, वाशिम आणि भंडारा येथे देखील परीक्षेत तांत्रिक अडचणी पुढे आल्या. ऑनलाइन गोंधळामुळे विद्यार्थींनी कोर्टाच्या आवारातच आंदोलन सुरु केले. या विद्यार्थ्यांना समर्थन देण्यासाठी सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके आंदोलन स्थळी दाखल झाले. याशिवाय कल्याणमधील विद्यार्थ्यांसोबत अभिजीत दिपके यांनी व्हिडीओ कॉलवर संवाद साधला.

मुंबई उच्च न्यायालयाच्या लिपिक पदाची डिसेंबरला २०२५ जाहिरात निघाली होती. महाराष्ट्रामध्ये १३८० जागा आहेत.२६ एप्रिलला पूर्व परीक्षा झाली. एक महिन्यात मेन्स होती. ती साडेतीन महिन्याने झाली. आज हायकोर्ट लिपिक पदासाठी आज टंकलेखन परीक्षा होती. ही परीक्षा २० मार्कांची असून वेळ १० मिनिटं होती. यामध्ये उमेदवारांना लीगल पेसेज टाइप करायचा होता. परीक्षा सुरु असातना सॉफ्टवेअरमध्ये ग्लीचेस आले. कीबोर्ड लहान मोठे होते. कीपॅड वरील की दबत नव्हत्या. स्क्रीन दिसत नव्हती. सगळ्यांचा लॉगीन सेम टाईमला झालं नाही . त्यामुळे आपापसात गोंधळ झाला. एकूण शब्द आणि गाळलेले शब्द याची तुलना झाली नाही. अशा अनेक अडचणी विद्यार्थ्यांना आल्याची माहिती आहे. छत्रपती संभाजीनगरमधील सेव्हन हिल परिसरातील सुराणा नगरमधील परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरू होताच सर्व्हर डाऊन झाल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला. त्यामुळे शेकडो परीक्षार्थींची परीक्षा खोळंबली.लांबून आलेल्या परीक्षार्थींना अचानक आलेल्या या तांत्रिक अडचणीचा फटका बसल्यानं केंद्रावर संतापाचं वातावरण निर्माण झालं होतं. काही परीक्षार्थींनी गोंधळ घातल्यानंतर वरिष्ठ अधिकारी आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. अधिकाऱ्यांकडून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न सुरू असला, तरी परीक्षा पुन्हा घेतली जाणार की परीक्षार्थींना अतिरिक्त वेळ दिला जाणार? याबाबत अद्याप स्पष्टता नाही. तांत्रिक बिघाडाचा फटका परीक्षार्थींना बसला असून आता परीक्षा प्रशासन **(पान ४ वर)**

# दबावातून फिर्याद की दहशतीमुळे दहशतीमुळे माघार..?

## सागर बेग यांच्या विरोधातील तक्रार खोटी असल्याचा पीडितेचा दावा

### बेग बंधूंच्या दहशतीमुळे फिर्यादी पलटल्याचा चित्ते यांचा दावा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री





**श्रीरामपूर :** शिर्डी पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या अत्याचार व आर्म्स ॲक्टच्या प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले आहे. या प्रकरणातील पीडित महिलेने श्रीरामपूर येथे पत्रकार परिषद घेऊन आपल्यावर प्रकाश चित्ते आणि रवी पाटील यांनी दबाव आणून फिर्याद दाखल करण्यास भाग पाडले, असा गंभीर आरोप केला आहे. दुसरीकडे, हिंदू रक्षा कृती समितीचे निमंत्रक प्रकाश चित्ते यांनी संबंधित महिलेने पूर्वी केलेल्या आरोपांपासून माघार घेण्यामागे कथित बेग टोळीची दहशत कारणीभूत असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे दोन्ही बाजूंच्या परस्परविरोधी आरोपांमुळे या प्रकरणाचे गूढ अधिकच वाढले आहे.

पीडितेच्या म्हणण्यानुसार, २१ जुलै रोजी सकाळपासून प्रकाश चित्ते आणि रवी पाटील यांनी व्हॉट्सॲपवरून आठ ते दहा वेळा संपर्क साधला. सागर बेग, सोनू बेग आणि बाबू साळवे यांच्याविरुद्ध फिर्याद दाखल करण्यास सांगण्यात आले. तसेच 'शिर्डी पोलिस ठाण्यात सर्व सेटिंग आहे, तेथे जाऊन डीवायएसपी अमोल भारती यांना भेटा,' असे सांगण्यात आल्याचा तिचा दावा आहे. त्यानंतर आपण शिर्डी पोलिस ठाण्यात जाऊन डीवायएसपी अमोल भारती यांची भेट घेतली. चित्ते आणि पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे आपली फिर्याद नोंदवून घेण्यात आली; मात्र ती फिर्याद नोंदवल्यानंतर आपल्याला वाचून दाखविण्यात आली नाही. लिहिता-वाचता येत नसल्याने आपला अंगठा घेण्यात आला, असा आरोप पीडितेने केला आहे.

'न्यायालयातही तुम्ही याच पद्धतीने सांगा,' असे डीवायएसपी **(पान ४ वर)**

## आई-मुलाला काठीने मारहाण, २५ हजारांचा ऐवज लंपास

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** शहरातील घोडेगाव रोड परिसरातील अंबीलओढा येथे मध्यरात्री तिघा चोरट्यांनी घरात घुसून धुमाकूळ घातला. घरफोडीच्या उद्देशाने आलेल्या चोरट्यांनी घरातील महिला व तिच्या मुलाला काठीने मारहाण करून त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने बळजबरीने हिसकावून नेले. तसेच घरातील कपाटातून रोकडही लंपास केली. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व संध्येला घडलेल्या या घटनेमुळे श्रीगोंदा तालुक्यासह आंबील ओढा परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

दि. १३ ऑगस्ट रोजी रात्री सव्वादोनच्या सुमारास उषा सचिन शिरसाठ यांच्या घरी हा प्रकार घडला. घरात घुसलेल्या तीन अज्ञात चोरट्यांनी फिर्यादी उषा शिरसाठ व त्यांचा मुलगा संग्राम शिरसाठ यांना काठीने मारहाण केली. त्यानंतर उषा यांच्या गळ्यातील सोन्याचे गंठण तसेच त्यांची मुलगी समिक्षा हिच्या गळ्यातील सोन्याची चैन बळजबरीने ओढून नेली.चोरट्यांनी एवढ्यावरच न थांबता घरातील कपाटाची झडती घेत ६ हजार रुपयांची रोकडही लंपास केली. चोरीस गेलेल्या ऐवजामध्ये सोन्याचे गंठण, सोन्याची चैन, सोन्याच्या बुगड्या, चांदीचे जोडवे आणि रोख रक्कम असा एकूण २५ हजार ५०० रुपयांचा **(पान ४ वर)**

# दुबैय्या हत्याप्रकरणाच्या मुळापर्यंत जा, कोंबिंग राबवा

## धरणे आंदोलनाची दखल : पालकमंत्री विखे पाटलांच्या पोलीस प्रशासनाला सूचना

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी :** शहरातील युवा उद्योजक आकाश दुबैय्या यांच्या हत्येची घटना अंत्यत दुर्देवी असून, गोपनियता पाळून तपास सुरू आहे. घटनेच्या मुळापर्यत जाण्यासाठी पोलीसांचा प्रयत्न आहे. गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाने अधिकचे कोबिंग ऑपरेशन जिल्ह्यात राबविण्याच्या सूचना जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

एक महीन्यापुर्वी श्रीरामपूर शहरात आकाश दुबैय्या यांची हत्या झाली. मात्र मुख्य आरोपी



अजून सापडत नसल्याच्या पार्श्वभूमीवर दुबैया कुटुंबियांनी दोन दिवसांपासून धरणे आंदोलन सुरू केले आहे. मंत्री विखे पाटील यांनी उपोषण स्थळी येवून त्यांची भेट घेतली. दुबैय्या परिवाराच्या भावना त्यांनी समजावून घेतल्या.घडलेल्या घटनेबाबत कुटूंबियाच्या भावना अतिशय तीव्र असून, जनतेमध्येही घटनेबाबत अधिक चीड आहे. आज पर्यत झालेल्या तपासाबाबत अतिरिक्त पोलीस अधीक्षकांना माध्यमांसमोर माहीती देण्यास सांगितले असून, यामुळे तपास प्रक्रीयेबाबत समज गैरसमज दूर होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जिल्ह्यातील गुन्हेगारी अटोक्यात आणण्यात पोलीस प्रशासनाला यश येत आहे. पण अधिकच्या प्रमाणात कोंबिग ऑपरेशन राबविण्याच्या सूचना आपण जिल्हा पोलीस प्रशासनास दिल्या असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

जिल्हा पोलीस आणि समाजापुढे सध्या अमली पदार्थांच्या तस्करीचे मोठ आव्हान असून, यावरच अधिक लक्ष केंद्रीत करून अमली पदार्थ तस्करी रोखण्यावर लक्ष केंद्रीत करण्याच्या सूचना मंत्री विखे पाटील यांनी दिल्या. श्रीरामपूरातील महाविद्यालयांमध्ये आमली पदार्थ विक्री करणारे रॅकेट उघड झाले असल्याची बाब अतिशय गंभीर आहे. यामध्ये कोणालाही पाठीशी न घालण्याचे आदेश देण्यात आले असल्याचे मंत्री मंत्री विखे पाटील म्हणाले.

### सूत्रधारावर कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार

दुबैया कुटुंबाच्या धरणे आंदोलनाला नगराध्यक्ष करण ससाणे, श्रीरामपूर व्यापारी असोसिएशन, हिंदू एकता आंदोलन पक्ष, हॉटेल असोसिएशन यांच्यासह विविध पक्ष संघटनांनी पाठिंबा दिला. मुख्य आरोपींना अटक होईपर्यंत तसेच त्यांच्यावर संघटित गुन्हेगारी कायद्याअंतर्गत कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचे मयत आकाश दुबैया यांचे वडील शेखर दुबैया यांनी सांगितले.

## बियाणे घेऊन जाणाऱ्या शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यातील धारणगाव येथे कोपरगाव-कोळपेवाडी मार्गावर नितीन रणशूर यांच्या फेब्रेकेशन दुकानासमोर दोन मोटारसायकलींची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात बाळासाहेब दामू घुमरे यांचा मृत्यू झाला असून ते कोळगाव सांगवी ता.सिन्नर जि.नासिक येथील रहिवासी असल्याची माहिती आहे.

बाळासाहेब घुमरे हे शेतीच्या कामासाठी बियाणे घेऊन जात असताना त्यांच्या मोटारसायकलीला समोरून येणाऱ्या दुचाकीची धडक झाली. समोरून येणाऱ्या दुचाकीवर अनिल खाजेकर हे होते हे कोळपेवाडी येथून कोपरगावच्या दिशेने जात होते.या भीषण धडकेत बाळासाहेब घुमरे यांचा मृत्यू झाला, तर अनिल खाजेकर यांच्या डोक्याला आणि पायाला गंभीर दुखापत झाली **(पान ४ वर)**

# तिरंगा, भगवा आणि बदलती देशभक्ती

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

१५ ऑगस्ट रोजी, स्वातंत्र्यदिनी प्रत्येक घरावर तिरंगा अभिमानाने फडकताना दिसला. भारतीय राष्ट्रध्वजाचा इतिहास हा केवळ एका ध्वजाच्या निर्मितीचा इतिहास नाही; तो भारताच्या राष्ट्रकल्पनेचा, स्वातंत्र्यलढ्याचा, संविधानिक मूल्यांचा आणि विविध वैचारिक प्रवाहांतील संघर्षाचा इतिहास आहे. आज तिरंगा हा भारतीय प्रजासत्ताकाची सर्वमान्य ओळख आहे. स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताकदिनाच्या निमित्ताने प्रत्येक घरावर फडकणारा तिरंगा देशाच्या विविधतेला एका राष्ट्रीय भावनेत बांधतो. 'हर घर तिरंगा'सारख्या उपक्रमांमुळेही तिरंग्याभोवती देशभक्तीची व्यापक भावना निर्माण झाली आहे. मात्र, तिरंग्याचा हा आजचा सर्वमान्य स्वीकार पाहताना त्यामागील वैचारिक इतिहास विसरून चालणार नाही.

२२ जुलै १९४७ रोजी संविधानसभेने आजच्या तिरंग्याचा स्वतंत्र भारताचा राष्ट्रीय ध्वज म्हणून स्वीकार केला. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात ध्वज हा केवळ एका राजकीय पक्षाचा प्रतीक राहिला नव्हता; तो ब्रिटिश सत्तेविरोधातील व्यापक राष्ट्रीय संघर्षाचे प्रतीक बनला होता. चरख्याच्या जागी अशोकचक्र आले आणि तिरंगा स्वतंत्र भारताच्या सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताकाचे प्रतीक बनला. याच काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वैचारिक परंपरेत मात्र भगवा ध्वज हा भारताच्या सांस्कृतिक राष्ट्रस्वरूपाचा अधिक योग्य प्रतीक असल्याची भूमिका मांडली जात होती. संघाचे तत्कालीन सरसंघचालक माधवराव सदाशिवराव गोळवलकर यांच्या लेखनात तिरंग्याच्या स्वीकारावर टीका करण्यात आली होती. 'ड्रिफ्टिंग अँड इमिटेटिंग' या लेखात तिरंग्याची संकल्पना भारतीय परंपरेतून नैसर्गिकपणे आलेली नसून इतर देशांच्या ध्वजांचे अनुकरण असल्याचा युक्तिवाद करण्यात आला. भगवा ध्वज भारतीय संस्कृतीशी अधिक सुसंगत असल्याचे प्रतिपादन करण्यात आले.

१४ ऑगस्ट १९४७ रोजी 'ऑर्गनायझर'मध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखातही तिरंग्याच्या तीन रंगांवर आक्षेप घेण्यात आला होता. त्या काळातील या भूमिका आजच्या तिरंग्याच्या सर्वमान्य स्वीकाराच्या पार्श्वभूमीवर पाहिल्या, तर वैचारिक प्रवासातील मोठा बदल स्पष्टपणे जाणवतो. हा वाद केवळ भगवा आणि तिरंगा यांच्यातील नव्हता. त्यामागे दोन वेगवेगळ्या राष्ट्रकल्पना होत्या. एकीकडे भारतीयत्वाची व्याख्या सांस्कृतिक परंपरा आणि हिंदू वारशाशी जोडणारी भूमिका होती; तर दुसरीकडे धर्म, जात, भाषा किंवा प्रादेशिक ओळख यापलीकडे जाऊन समान नागरिकत्वावर आधारित भारतीय राष्ट्रवादाची संकल्पना होती. भारतीय राज्यघटनेने दुसरा मार्ग स्वीकारला. त्यामुळे तिरंगा कोणत्याही एका धर्माचा, पंथाचा किंवा संघटनेचा ध्वज न राहता प्रत्येक भारतीय नागरिकाचा ध्वज झाला. संघाच्या नागपूर मुख्यालयावरील तिरंग्याच्या इतिहासाचाही याच संदर्भात विचार करावा लागतो. उपलब्ध वृत्तनोंदीनुसार १५ ऑगस्ट १९४७ आणि २६ जानेवारी १९५० रोजी तेथे तिरंगा फडकवण्यात आला होता. त्यानंतर २६ जानेवारी २००२ रोजी पुन्हा तिरंगा फडकवण्यात आला. या प्रदीर्घ अंतरावरून अनेक वर्षे राजकीय वाद झाले. संघाच्या बाजूने त्यावेळच्या ध्वजसंहितेतील नियमांचा संदर्भ देण्यात आला; तर टीकाकारांनी संघाच्या राष्ट्रध्वजाबाबतच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. २००२ नंतर मात्र सार्वजनिक पातळीवर तिरंग्याचा स्वीकार अधिक ठळक झाला. पुढे संघ आणि भारतीय जनता पक्षाशी संबंधित सार्वजनिक राजकारणातही तिरंगा हा राष्ट्रभक्तीचा महत्त्वाचा प्रतीक म्हणून ठामपणे पुढे आला.

२०१८ मध्ये मोहन भागवत यांनी तिरंग्याच्या सन्मानाबाबत संघाची भूमिका स्पष्ट करताना भगवा हा संघाचा ध्वज आणि तिरंगा हा भारताचा राष्ट्रध्वज असल्याचे भेद अधोरेखित केले. हा भेद महत्त्वाचा आहे. एखाद्या संस्थेला आपला सांस्कृतिक ध्वज प्रिय असणे आणि भारतीय राष्ट्राचा अधिकृत ध्वज म्हणून तिरंग्याचा स्वीकार करणे, या दोन स्वतंत्र बाबी आहेत.

मात्र येथे एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. पूर्वी तिरंग्याबाबत तीव्र आक्षेप व्यक्त केले गेले असतील, तर आजच्या स्वीकाराला स्पष्ट वैचारिक पुनर्विचार म्हणून मान्यता का दिली जाऊ नये? विचार बदलणे हा दोष नाही. उलट बदलत्या वास्तवाचा स्वीकार करण्याची क्षमता ही वैचारिक प्रगल्भतेची खूण आहे. पण पूर्वीची भूमिका काय होती, त्या भूमिकेत बदल का झाला आणि आजची भूमिका नेमकी काय आहे, हे स्पष्ट सांगण्याचे धैर्य असणे आवश्यक आहे. आज 'हर घर तिरंगा'च्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर तिरंगा फडकवावा, अशी व्यापक मोहीम राबवली जाते. तिरंगा फडकवणे, त्याचा सन्मान करणे आणि राष्ट्रभ िची भावना व्यक्त करणे यात निश्चितच काही गैर नाही. परंतु देशभक्तीचे मोजमाप केवळ तिरंगा फडकवला की नाही, यावर होऊ लागले तर प्रश्न निर्माण होतो. तिरंगा फडकवणारा देशभक्त आणि तो न फडकवणारा देशद्रोही, अशी विभागणी लोकशाहीला शोभणारी नाही. कारण तिरंग्याचा खरा अर्थ त्याच्या बाह्य प्रदर्शनापेक्षा मोठा आहे. केशरी रंग त्याग आणि धैर्याची आठवण करून देतो; पांढरा शांतता आणि सत्याचा संदेश देतो; हिरवा समृद्धी व विकासाची भावना व्यक्त करतो आणि मध्यभागी असलेले अशोकचक्र सतत पुढे जाण्याचा संदेश देते. हा ध्वज सैनिकाचा आहे, तसाच शेतकऱ्याचाही आहे. तो कामगाराचा आहे, शिक्षकाचा आहे, वैज्ञानिकाचा आहे, व्यापाऱ्याचा आहे आणि सर्वसामान्य नागरिकाचाही आहे. म्हणूनच तिरंगा कोणत्याही पक्षाचा किंवा संघटनेचा राजकीय ध्वज होऊ शकत नाही. भगवा रंग भारतीय संस्कृतीत प्राचीन आहे. त्याला धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. भगव्याचा आदर करणे आणि तिरंग्याचा सन्मान करणे यात कोणताही विरोधाभास नाही. विरोधाभास तेव्हा निर्माण होतो, जेव्हा एखाद्या सांस्कृतिक प्रतीकाला राष्ट्रराज्याच्या अधिकृत प्रतीकाचा पर्याय म्हणून उभे केले जाते. आज तिरंग्याचा स्वीकार झाला असेल तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. पण त्या स्वीकारासोबत इतिहासाचे भानही आवश्यक आहे. पूर्वीची भूमिका चुकीची होती, असा स्पष्ट पुनर्विचार झाला असेल तर तो खुलेपणाने मांडण्यात गैर काय? उलट त्यातून समाजाला वैचारिक प्रामाणिकतेचा संदेश मिळेल. मात्र इतिहासातील भूमिका सोयीस्करपणे विसरून आज तिरंग्याच्या नावावर राष्ट्रभक्तीचे राजकारण करणे योग्य नाही. देशभक्ती ही कोणत्याही एका पक्षाची, संघटनेची किंवा विचारसरणीची मालमत्ता नाही. तिरंगाही कोणत्याही पक्षाचा ध्वज नाही. तो भारतीय संविधानाच्या मूल्यांचा आणि समान नागरिकत्वाचा ध्वज आहे. त्यामुळे तिरंग्याचा सन्मान करताना संविधानाचा सन्मान, लोकशाहीचा सन्मान आणि प्रत्येक नागरिकाच्या समान अधिकारांचा सन्मानही तितकाच महत्त्वाचा आहे. विचार बदलणे गैर नाही; पण विचार बदलल्याचे प्रामाणिकपणे मान्य करणे महत्त्वाचे आहे. आज घराघरांत तिरंगा फडकत असेल तर हे निश्चितच अभिमानाचे दृश्य आहे. मात्र त्या तिरंग्याकडे केवळ राष्ट्रवादाच्या प्रदर्शनाच्या नजरेने न पाहता त्यामागील स्वातंत्र्यलढा, संविधान, समान नागरिकत्व आणि विविधतेतील एकतेची भावना समजून घेणे गरजेचे आहे. तिरंगा हा राजकीय घोषणेचा विषय नाही; तो भारतीयत्वाची सामूहिक ओळख आहे. त्याचा सन्मान कोणाच्या बदलत्या राजकीय भूमिकेवर अवलंबून नसून, तो भारतीय प्रजासत्ताकाच्या प्रत्येक नागरिकाच्या समान अधिकाराचा आणि कर्तव्याचा भाग आहे.

# जायगुडे आखाड्यात धर्मध्वजारोहणाने अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील जायगुडे आखाडा येथील श्री हनुमान मंदिरात श्रावण मासानिमित्त त्रिदिनात्मक अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. ह.भ.प. विजय महाराज पवार यांच्या हस्ते धर्मध्वजारोहण करून सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. यंदा या सोहळ्याचे २८ वे वर्ष आहे.

श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबा, वै. ह.भ.प. बन्सी महाराज तांबे व योगीराज मौनी बाबा यांच्या आशीर्वादाने तसेच ह.भ.प. प.पू. गुरुवर्य महंत भास्करगिरीजी महाराज, स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज व वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या प्रेरणेने हा सोहळा १५ ते १८ ऑगस्टदरम्यान आयोजित करण्यात आला आहे.

शनिवारी सकाळी श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर, नेवासा येथून ज्योत आणून सप्ताहास प्रारंभ करण्यात आला. यावेळी विजय महाराज पवार, गणेश महाराज दरंदले, रविंद्र कोकणे, बाबासाहेब चव्हाण,



मच्छिंद्र कोतकर, रोहित गंडाळ, अमोल चव्हाण, महेश चव्हाण, चैतन्य तनपुरे, अशोक बेद्रे, राजेंद्र चव्हाण, दत्ता जायगुडे, अमोल कोकणे, आबासाहेब कोतकर, ज्ञानेश्वर जायगुडे, वैभव भाकरे, अतुल टेमक यांच्यासह भाविक उपस्थित होते.

सप्ताहात पहाटे काकडा आरती, विष्णुसहस्रनाम, हनुमान चालीसा, ज्ञानेश्वरी व किसनगिरी विजय ग्रंथ पारायण, हरिपाठ आणि हरिकीर्तन असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. विजय महाराज पवार, देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री व गणेश महाराज तनपुरे यांची कीर्तनसेवा होणार आहे.

# आदर्श विद्यामंदिर सोनई येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिंगणापूर :** सोनई येथील आदर्श विद्यामंदिर विद्यालयात देशाचा ८०वा स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण व मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव रविराज तुकाराम पाटील गडाख होते.

ह.भ.प. वेदांताचार्य भगवानजी महाराज जंगले (शास्त्री) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे अरुण चांदघोडे, सोमनाथ महाराज गडाख, प्रमोद घावटे, विशाल भळगट, संभाजी गडाख, गहिनीनाथ काळे, गोरक्षनाथ डौले, डॉ. संतोष लांडे, सोमनाथ सोनवणे, प्रदीप बाफना, मुकेश भळगट, सचिन भागवत, साळुंखे मेजर, श्रीकृष्ण देशमुख, रामदास भनगे आदी उपस्थित होते.

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीताने पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राथमिक व माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक तसेच सर्व शिक्षकवृंदाने परिश्रम घेतले.

# जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्थेच्या नेवासा शाखेचा १० कोटींच्या ठेवींचा टप्पा पूर्ण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा. :** अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अहिल्यानगर यांच्या श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयासमोर असलेल्या नेवासा येथील शाखेने पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवश्री इंजिनियर विजयकुमार ठुबे यांच्या मार्गदर्शनाखाली दि.३१ जुलै अखेर १० कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला त्याबद्दल नेवासा शाखेतील शाखाध्यक्ष अधिकारी व कर्मचारी वर्गाचे सभासदांमधून कौतुकाचा वर्षावाङ्रे अभिनंदन केले जात आहे.




यावेळी नेवासा शाखेमध्ये झालेल्या सत्कार समारंभ कार्यक्रम प्रसंगी शाखाध्यक्ष संभाजीराव मते पाटील यांच्यासह श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा. राधाताई मोटे सेवानिवृत्त झाल्याबद्दल, ज्येष्ठ सल्लागार त्र्यंबकराव सुकाळकर यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे शाखाध्यक्ष शिवश्री संभाजीराव मते पतसंस्थेची वाटचाल ही सभासदांनी विश्वास व्यक्त करत दिलेल्या पाठबळामुळे उत्कर्षाकडे चालली असून दहा कोटींचा टप्पा हे सभासदांची खंबीर साथ व विश्वासामुळेच पार पडला असल्याचे सांगितले

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष रावसाहेब घुमरे, पतसंस्थेचे ज्येष्ठ सल्लागार प्रा. किशोर धनवटे, मुरलीधर मते, बबनराव पवार, किशोर भणगे,रेवणनाथ शेळके ,दत्तात्रय निपुंगे, राजेश जगताप, जिजाऊ ब्रिगेडच्या शिवमती शारदाताई वांडेकर,अनिता मते,सोनाली घोलप,उज्वला मते,पतसंस्थेचे कायदेशीर सल्लागार ॲड. लोहकरे,ॲड. नितीन अडसुरे, शाखाधिकारी संतोष पारखे, लिपिक सुरज कडू,कॅशियर निलेश जाधव,खातेदार सभासद अक्षय देवखिळे,बंडा कराळे,आनंद डांगे,अमृत कोठारी यांच्यासह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सर्व पदाधिकाऱ्यांनी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष इंजिनियर विजयकुमार ठुबे यांच्या कुशल मार्गदर्शनामुळेच नेवासा शाखेने दहा कोटी ठेवींचा टप्पा पार केला असल्यामुळे उपस्थित सभासदांनी टाळयांचा गजर करत त्यांचे अभिनंदन झालेल्या कार्यक्रम प्रसंगी केले.

# नेवासा आगारातील ५ नवीन 'राजमाता जिजाऊ' बसेस

## आ. विठ्ठलराव लंघे यांच्या हस्ते लोकार्पण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे. 'राजमाता जिजाऊ' या नावाने ५ नवीन एस.टी. बसेस नेवासा आगाराच्या ताफ्यात दाखल झाल्या असून या बसेसचे लोकार्पण आमदार लंघे यांच्या हस्ते स्वातंत्र्य दिनी उत्साहात पार पडले.

आ. विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या कार्यकाळात यापूर्वी नेवासा आगाराला १० नवीन एस.टी. बसेस उपलब्ध झाल्या होत्या. आता आणखी ५ बसेस मिळाल्याने त्यांच्या कार्यकाळात नेवासा आगाराच्या ताफ्यात दाखल झालेल्या नवीन बसेसची संख्या एकूण १५ झाली आहे. ग्रामीण भागातील प्रवासी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, नोकरदार आणि भाविकांच्या दृष्टीने ही मोठी उपलब्धी मानली जात आहे.

नेवासा तालुका भौगोलिकदृष्ट्या मोठा असून श्री क्षेत्र शनीशिंगणापूर, श्री क्षेत्र देवगड आणि श्री क्षेत्र नेवासा यांसारख्या महत्त्वाच्या धार्मिक स्थळांमुळे तालुक्यात स्थानिक नागरिकांसोबतच भाविकांचीही मोठी वर्दळ असते. त्यामुळे वाढत्या प्रवासी संख्येच्या तुलनेत नेवासा आगारात नवीन व सुरक्षित बसेसची आवश्यकता सातत्याने जाणवत होती. या पार्श्वभूमीवर आ. लंघे पाटील यांनी शासन व परिवहन विभागाकडे नवीन बसेस उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला.

**आणखी ५ ते १० नवीन बसेससाठी पाठपुरावा आमदार विठ्ठलराव लंघे**

नेवासा आगाराला माझ्या कार्यकाळात आतापर्यंत एकूण १५ नवीन बसेस मिळाल्या आहेत. तालुक्याची गरज आणि प्रवासी संख्या लक्षात घेता आणखी ५ ते १० नवीन बसेस मिळविण्यासाठी माझा पाठपुरावा सुरू राहील. नेवाशातील नागरिकांना अधिक सक्षम, सुरक्षित आणि दर्जेदार एस.टी. सेवा उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे.

बसेसच्या लोकार्पणप्रसंगी बोलताना आ. लंघे पाटील म्हणाले की ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांसाठी एस.टी. ही केवळ प्रवासाची सुविधा नसून शिक्षण, रोजगार, आरोग्य, बाजारपेठ आणि दैनंदिन जीवनाशी जोडणारी जीवनवाहिनी आहे. नेवासा आगाराला आतापर्यंत १५ नवीन बसेस मिळाल्या आहेत. मात्र एवढ्यावरच न थांबता आणखी ५ ते १० नवीन बसेस नेवासा आगाराला मिळाव्यात, यासाठी शासन आणि परिवहन विभागाकडे आपला पाठपुरावा सुरू राहणार असून त्या बसेसही लवकरच मिळतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



नेवासा आगाराला नवीन बसेस उपलब्ध करून देत तालुक्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सकारात्मक सहकार्य केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, तसेच अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री विखे पाटील यांचे आ. विठ्ठलराव लंघे यांनी विशेष आभार मानून अभिनंदन केले. नेवासा तालुक्याच्या विकासासाठी राज्य शासनाचे असेच सहकार्य यापुढेही मिळत राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी झालेल्या लोकार्पण कार्यक्रम प्रसंगी नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले,शिवसेना नेते भाऊसाहेब वाघ,शंकरराव लोखंडे,भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली पेचे,संपर्क प्रमुख बाळासाहेब पवार,नगरसेवक प्रवीण सरोदे,संदीप सरकाळे,कृष्णा परदेशी, नेवासा आगार व्यवस्थापक संदीप ढवळे, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, पंचायत समिती गटविकास अधिकारी संजय लखवाल,अँड.अशोक करडक, नितीन जगताप, अंबादास रोडे, रामभाऊ केंदळे,सौ.शिवसेना महिला आघाडीच्या शोभाताई आलवणे यांच्यासह विविध पदाधिकारी, अधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दाढ बुद्रुकमध्ये नवनाथ महाराज कथा सोहळ्याचे आयोजन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार :** श्रावण मासानिमित्त दाढ बुद्रुक येथे वैकुंठवासी संत मुकुंदास महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व वरद विनायक सेवाधामचे मठाधिपती महंत गुरुवर्य उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हनुमंतरायाचा अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या धार्मिक सोहळ्यानिमित्त अडबंगनाथ देवस्थानचे मठाधिपती स्वामी अरुणगिरीजी महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून नवनाथ महाराज कथा सोहळा रंगणार आहे. मंगळवार, १८ ऑगस्टपासून कथा सोहळ्यास प्रारंभ होणार असून, दररोज सायंकाळी ६.३० ते रात्री ९ वाजेपर्यंत कथावाचन होणार आहे. नवनाथ महाराजांचे जीवनचरित्र, अध्यात्मिक विचार व भक्तीपरंपरेचा परिचय भाविकांना संगीतमय कथेतून करून देण्यात येणार आहे. कथेनंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्याच्या तयारीसाठी ग्रामस्थांनी जय्यत तयारी केली असून, दाढ बुद्रुक व पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कथा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.

# बेलकरवाडीच्या दक्षिणमुखी हनुमान मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**ताहाराबाद :** श्रीक्षेत्र ताहाराबाद येथील बेलकरवाडी दक्षिणमुखी हनुमान मित्रमंडळाच्या वतीने मंगळवार, १८ ते २५ ऑगस्टदरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व भक्तविजय पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामस्थ व तरुणमंडळाच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या दक्षिणमुखी हनुमान मंदिरात दरवर्षी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

श्रावण महिन्याच्या पवित्र पर्वात होणाऱ्या या सप्ताहात काकडा भजन, अभिषेक, आरती, भक्तविजय पारायण, नैवेद्य, हरिपाठ, कीर्तन व रात्री जागर आदी कार्यक्रम होणार आहेत. महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तनसेवा यावेळी भाविकांना अनुभवता येणार आहे. अशोक महाराज शिंदे, नाना महाराज गागरे, तुकाराम महाराज बेलकर, लक्ष्मण महाराज पांचाळ, पांडुरंग महाराज पठारे, अर्जुन महाराज तनपुरे व संदीप महाराज जाधव यांची कीर्तनसेवा होणार आहे. २५ ऑगस्ट रोजी बाळकृष्ण महाराज कांबळे यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल.

सप्ताहानिमित्त ज्ञानदानासोबत अन्नदानाचा उपक्रमही राबविण्यात येणार आहे. भाविकांसाठी महाप्रसाद व इच्छा भोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. देवस्थानकडे मंडप, स्वयंपाकाची भांडी, साऊंड सिस्टिम व वाहनाची सुविधा असून, ती अल्पदरात उपलब्ध करून दिली जाते. या भक्तिमय सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष बाळासाहेब महाराज बेलकर व ग्रामस्थांनी केले आहे.

# धनगरवाडीत १७९वा गंगागिरी महाराज सप्ताह

## २५ ते ३० लाख भाविकांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वाकडी :** राहाता तालुक्यातील श्रीक्षेत्र धनगरवाडी येथे योगीराज सद्गुरू श्री गंगागिरी महाराज यांच्या प्रेरणेने आयोजित १७९व्या अखंड हरिनाम सप्ताहाची तयारी पूर्ण झाली आहे. १८ ते २५ ऑगस्टदरम्यान होणाऱ्या या सप्ताहासाठी सुमारे २०० एकर परिसरात नियोजन करण्यात आले असून, महाराष्ट्रासह विविध भागांतून २५ ते ३० लाख भाविक उपस्थित राहण्याचा अंदाज आहे.

ह. भ. प. गुरुवर्य नारायणगिरीजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व महंत रामगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सप्ताहाचे नियोजन करण्यात आले आहे. ३०० बाय २०० फुटांचा भव्य भजन मंडप उभारण्यात आला असून, तब्बल १६८ तास अखंड भजन सेवा होणार आहे. दररोज चार पहाऱ्यांमध्ये सुमारे १५ हजार टाळकरी सहभागी होणार आहेत.

लाखो भाविकांसाठी भव्य स्वयंपाकगृह उभारण्यात आले असून, ७५ डिझेल भट्ट्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. पाच दिवस आमटी-भाकरीचा महाप्रसाद देण्यात येणार असून, एकादशीला २५० क्विंटल साबुदाणा खिचडी, तर सांगतेला ४५० क्विंटल बुंदी व ७०० क्विंटल चिवड्याचे नियोजन आहे. कृषी प्रदर्शनात ३०० हून अधिक स्टॉल उभारण्यात येणार आहेत.

भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलिस बंदोबस्त, सीसीटीव्ही, आरोग्य केंद्र, पार्किंग व वाहतूक व्यवस्थेची तयारी करण्यात आली आहे. सप्ताहाच्या पहिल्या दिवशी चार ते पाच हजार दुचाकीस्वार भगवे ध्वज घेऊन महंत रामगिरीजी महाराजांच्या स्वागतासाठी भव्य भक्ती रॅली काढणार आहेत. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या पाठपुराव्याने पंचक्रोशीतील रस्त्यांसाठी चार कोटींचा निधी मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले.

# संजीवनी व श्री गणेश कारखान्यात स्वातंत्र्यदिन उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्यात देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा झाला. संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे उपस्थित होते. सुरक्षा विभागाच्या कर्मचाऱ्यांनी बँडपथकाच्या तालावर संचलन केले. संजीवनी इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व ध्वजगीत सादर केले. भारत माता की जयच्या घोषणांनी परिसर दुमदुमला.यावेळी उपाध्यक्ष ज्ञानेश्वर परजणे, संचालक बापूसाहेब बारहाते, राजेंद्र कोळपे, निलेश देवकर, बाळासाहेब वक्ते, ज्ञानदेव औताडे, रमेश आभाळे, आप्पासाहेब दवंगे, मनेष गाडे, ज्ञानेश्वर होन, विलासराव वाबळे, विलासराव माळी, त्रंबकराव सरोदे, रमेश घोडेराव यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व सभासद उपस्थित होते.

दरम्यान, गणेश सहकारी साखर कारखान्यात आमदार विवेक कोल्हे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. त्यांनी स्वातंत्र्यसैनिक व जवानांच्या त्यागाचे स्मरण करून देशाची एकता, अखंडता व संविधानिक मूल्ये जपण्याचे आवाहन केले. यावेळी चेअरमन सुधीर लहारे, व्हाईस चेअरमन विजय दंडवते, संचालक नारायणराव कार्ले, बाबासाहेब डांगे, बाळासाहेब चोळके, विष्णुपंत शेळके, आलेश कापसे, अनिल गाढवे, मधुकर सातव, सौ. अरुंधती फोफसे, कार्यकारी संचालक जी. बी. शिंदे यांच्यासह कर्मचारी, सभासद व ग्रामस्थ उपस्थित होते.

# स्वातंत्र्यदिनी कॅनरा बँकेकडून गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आश्वी :** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून कॅनरा बँकेच्या संगमनेर शाखेने सामाजिक बांधिलकी जपत देवगाव (ता. संगमनेर) येथील डॉ. अण्णासाहेब शिंदे विद्यालयातील इयत्ता ५ वी ते १० वीच्या मागासवर्गीय प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्या ज्योती शिष्यवृत्ती' प्रदान केली.

कॅनरा बँकेचे सहाय्यक व्यवस्थापक हर्षल ठाकरे, कर्मचारी समीर फाफाळे व विजय कासार यांच्या उपस्थितीत शिष्यवृत्ती वितरण कार्यक्रम झाला. यावेळी बँक अधिकाऱ्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम व पासबुक सुपूर्द करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला आर्थिक पाठबळ मिळावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

इयत्ता ५ वीतील आरोही सुरेश रोहम, ६ वीतील श्रद्धा गौतम पवार आणि ७ वीतील ऋतुजा निती ठोंबरे यांना प्रत्येकी तीन हजार रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली. तसेच ८ वीतील दिव्या गोरख पवार, ९ वीतील शीतल गोवर्धन माळी आणि १० वीतील नयन विनोद पवार यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. ही रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली.

या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळवून देण्यासाठी तुषार पानसरे यांनी कॅनरा बँकेच्या अधिकाऱ्यांशी सातत्याने समन्वय साधत विशेष सहकार्य केले. त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करण्यात आले.



विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाला चालना देणारा बँकेचा हा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे मत विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी व्यक्त केले. शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थांनी कॅनरा बँक प्रशासन आणि तुषार पानसरे यांचे आभार मानले.

# वृक्षलागवडीतून पर्यावरण संवर्धनाची चळवळ व्यापक करा : आ. खताळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करणे काळाची गरज आहे. वृक्षलागवडीमुळे परिसरातील हिरवाई वाढण्यासोबतच गावाचे सौंदर्य आणि पर्यावरण समृद्ध होते. त्यामुळे वृक्षारोपण व संवर्धनाची चळवळ व्यापक करावी, असे आवाहन आमदार अमोल खताळ यांनी केले. घारगाव येथील माजी विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष गणेश धात्रक यांच्या मातोश्री प्रतिष्ठानच्या वतीने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून घारगाव-शिदायकवाडी रस्त्यालगत डोंगर परिसरात आमदार खताळ यांच्या हस्ते वड व करवंदाच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. खताळ म्हणाले, वाढदिवस व विविध समारंभांचे औचित्य साधून शुभेच्छांऐवजी प्रत्येकाने एक झाड लावण्याचा संकल्प करावा. झाड लावणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्याचे नियमित संगोपन करणे आवश्यक आहे. वृक्षसंवर्धनासोबत जलसंवर्धनालाही प्राधान्य द्यावे. यावेळी गुलाब भोसले, रऊफ शेख, शैलेश फटांगरे, नितीन आहेर, रेश्मा धात्रक यांच्यासह मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## गुळवे वस्ती शाळेत स्वातंत्र्यदिन उत्साहात

**झरेकाठी** : रहिमपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गुळवे वस्ती येथे स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शिस्तबद्ध संगीत कवायतीने उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी ओजस्वी भाषणांतून स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक प्रसंगांना उजाळा देत तिरंग्याचा सन्मान राखण्याचा संदेश दिला. उपक्रमशील शिक्षिका संगीता गीते व जिल्हा आदर्श पुरस्कारप्राप्त शिक्षक संजय कडलग यांनी 'विकसित भारत २०४७' साकारण्यासाठी सक्षम मनुष्यबळ घडविण्याचा संकल्प व्यक्त केला. गणपतराव शिंदे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना राष्ट्रध्वज, बॅचेस व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सचिन शिंदे, पप्पू गाडे यांनी मार्गदर्शन केले. सागर शिंदे यांनी शाळेच्या विकासासाठी सहकार्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमास ग्रामस्थ, पालक, शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.

## ओंकारेश्वर महादेव मंदिरात श्रावण मास व वर्धापन दिना निमित्ताने कीर्तन महोत्सव

**कुकाणा** : नेवासा तालुक्यातील कुकाणा व परिसरातील येथील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्री ओंकारेश्वर महादेव मंदिराचा वर्धापन दिन व श्रावण मासा निमित्ताने सोमवार दि. १७ रोजी विविध धार्मिक कार्यक्रम व कीर्तन महोत्सावाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महोत्सव कमिटीने दिली. पहिला श्रावण सोमवार व वर्धापन दिनाचे आचित्य साधत ओंकारेश्वर महादेव मंदिर व परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. तर सोमवारी सकाळी अभिषेक व ९ ते ११ दरम्यान श्री क्षेत्र सदगुरु नारायणगिरी महाराज आश्रमचे (सुरेगाव गंगा) प्रमुख उध्दव महाराज मंडलीक यांचे हरीकीर्तन होणार आहे. कुकाणा व परिसरातील भाविकांनी या कीर्तन महोत्सावाचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर कमिटी व सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

## देडगाव ग्रामपंचायतीत ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**बालाजी देडगाव** : देडगाव ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तर सरपंच चंद्रकांत मुंगसे यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेच्या विद्यार्थ्यांच्या वतीने वंदे मातरम व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. उपस्थितांनी तिरंगा ध्वजाला मानवंदना देत देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले. मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक ग्रामविकास अधिकारी संतोष उल्हारे यांनी केले. कार्यक्रमास माजी सरपंच बाजीराव पाटील मुंगसे, ज्ञानेश्वर कारखान्याचे संचालक जनार्धन कदम, केंद्रप्रमुख भास्कर तांबे, पोलीस उपनिरीक्षक दादासाहेब वाहूरवाघ, मुख्याध्यापक संभाजी कडू, नवनाथ मुंगसे, ज्येष्ठ पत्रकार एडके, मेजर संजय काळे, मेजर देवकाते, मेजर सोमनाथ मुंगसे, मेजर गंगाधर बावधनकर, माजी उपसरपंच महादेव पुंड, रामचंद्र कदम, मच्छिंद्र मुंगसे , भाऊसाहेब सावंत गुरुजी, अरुण वांढेकर, शिवाजी तांबे, पोपटराव बनसोडे, पांडूभाऊ एडके, हरिभाऊ देशमुख आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिंगणापूर रेल्वेमार्गावरील शेतकऱ्यांच्या जमिनी वाचविण्यासाठी तनपुरे आक्रमक

## नगर–मनमाड महामार्गावर रास्ता रोको

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी ते शनिशिंगणापूर प्रस्तावित रेल्वेमार्गासाठी शेतजमिनी संपादित करण्याच्या हालचालींना विरोध करत आमदार प्राजक्त तनपुरे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी नगर–मनमाड महामार्गावरील कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर रास्ता रोको आंदोलन केले. शेतकऱ्यांच्या जमिनी वाचविण्यासाठी प्रशासनाने अंतिम निर्णय घेण्यासाठी दहा दिवसांची मुदत देण्यात आली. आमदार तनपुरे म्हणाले, रेल्वेमार्गासाठी जमिनी संपादित झाल्यास अनेक शेतकरी कुटुंबांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा या प्रकल्पाला तीव्र विरोध आहे.



यापुढे रेल्वे अधिकाऱ्यांना शेतात येऊ देणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला. या विषयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी दोन वेळा चर्चा झाली असून, त्यांनी मदतीचे आश्वासन दिल्याचे तनपुरे यांनी सांगितले. जमीन संपादनासंदर्भातील सुनावणीसाठी शेतकऱ्यांना सुमारे ४० किलोमीटर दूर श्रीरामपूर येथे जावे लागू नये, यासाठी श्रीरामपूरच्या प्रांत अधिकाऱ्यांनी राहुरीत येऊन सुनावणी घ्यावी, अशी मागणी तनपुरे यांनी केली.

तहसीलदार डॉ. अमित पवार यांनी याबाबत लेखी आश्वासन दिल्याने १९ ऑगस्टची सुनावणी राहुरीत होणार असल्याचे सांगण्यात आले.

शेतकऱ्यांच्या मागण्यांवर निर्णय झाला नाही तर आंदोलनाची दिशा अधिक तीव्र करण्यात येईल, प्रसंगी तालुका बंद करण्याचा इशाराही तनपुरे यांनी दिला. आंदोलनादरम्यान काही शेतकरी भावूक झाले. रास्ता रोकोमुळे महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मात्र, रुग्णवाहिका आल्याने आमदार तनपुरे यांच्या सूचनेनुसार पोलिसांनी तत्काळ रस्ता मोकळा करून दिला.

यावेळी शिंदे शिवसेनेचे रावसाहेब खेवरे, रवींद्र मोरे, राजूभाऊ शेटे, भाजपचे सुरेश बनकर, राहुरी नगर परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब मोरे, उपाध्यक्ष गजानन सातभाई यांच्यासह अनेक पदाधिकारी, शेतकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदन तहसीलदार डॉ. अमित पवार व पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांना देण्यात आले.

### सुनावणी राहुरीतच घेण्याचे लेखी आश्वासन

शेतकऱ्यांच्या जमिनी संपादनासंदर्भातील सुनावणी श्रीरामपूरऐवजी राहुरीत घेण्याची मागणी करण्यात आली होती. शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी श्रीरामपूरच्या प्रांत अधिकाऱ्यांनी राहुरीत येऊन सुनावणी घेण्याचे तहसीलदारांनी लेखी आश्वासन दिले. त्यामुळे १९ ऑगस्ट रोजीची सुनावणी राहुरीत होणार आहे. प्रशासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

## नेवासा शहरात स्वातंत्र्यदिन उत्साहात; विविध ठिकाणी ध्वजारोहण

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासा शहर व परिसरात ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विविध शासकीय, निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये व संस्थांच्या वतीने ध्वजारोहण करून तिरंग्याला मानवंदना देण्यात आली. विविध ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. नेवासा तहसील कार्यालयाच्या प्रांगणात तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण झाले.



यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, अप्पर तहसीलदार सोनाली मात्रे, गटविकास अधिकारी संजय लखवाल, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, मुख्याधिकारी निखिल फराटे, नायब तहसीलदार चांगदेव बोरुडे, संदीप चिंतामण, गोसावी, पुरवठा अधिकारी सुदर्शन दुर्योधन, सहायक पोलीस निरीक्षक अमोल पवार, उपनिरीक्षक संदीप शिंदे, विकास पाटील, श्रद्धा वैद्य आदी उपस्थित होते. पंचायत समितीचे ध्वजारोहण संजय लखवाल, नगरपंचायतीचे डॉ. करणसिंह घुले, होमगार्ड दलाचे बाळासाहेब देवखिळे, पोलीस दलाचे प्रताप दराडे, तलाठी कार्यालयाचे अनिल गव्हाणे, नेवासा खुर्द सोसायटीचे मच्छिंद्र कडू पाटील, श्रीराम ग्राहक मंचचे प्रमोद पोतदार, तर वडार सोसायटीचे वसंत लष्करे यांच्या हस्ते झाले.

सेव्हनंथ डे स्कूल, ज्ञानोदय इंग्लिश स्कूल, बदामबाई हायस्कूल, अलअमीन उर्दू हायस्कूल, जिल्हा परिषद शाळा, श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय, सेंट मेरी इंग्लिश स्कूल, आदर्श विद्यालयासह विविध शाळांमध्येही ध्वजारोहण व सांस्कृतिक कार्यक्रम झाले. यावेळी भाऊसाहेब वाघ पाटील, शालिनीताई सुखदान, सागर झावरे, अशोक ताके, राहुल आढाव, राजेंद्र चव्हाण, विश्वास वाघमारे, धनंजय परदेशी, ॲड. संजय सुखदान, निरंजन डहाळे, महेश लोखंडे, प्रविण सरोदे, स्वप्नील मापारी, असिफ पठाण, जयश्री शिंदे, जालिंदर गवळी, दिनेश व्यवहारे, संभाजी धोत्रे, शांताराम गायके, गफूरभाई बागवान, बालेंद्र पोतदार, मनोज पारखे, सुरेश लष्करे, विजय दहिवाळकर, अंबादास लष्करे, राजू कडू आदी उपस्थित होते.

## सात दिवसांत चौकशीचे आश्वासन घोलप यांचे उपोषण मागे



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : वाघापूर ग्रामपंचायतीतील सन २०२४–२५ व २०२५–२६ या आर्थिक वर्षांतील १५ टक्के मागासवर्गीय निधीच्या खर्चात अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत माजी उपसरपंच विनोद घोलप यांनी पंचायत समिती कार्यालयासमोर सुरू केलेले उपोषण लेखी आश्वासनानंतर मागे घेतले. गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांनी संबंधित सरपंच व ग्रामसेवकांकडून सात दिवसांत खुलासा मागवून नियमानुसार योग्य ती कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर सामाजिक कार्यकर्त्या नीलम खताळ व गटविकास अधिकारी सिनारे यांच्या हस्ते नारळपाणी घेऊन घोलप यांनी उपोषण सोडले. घोलप यांनी संबंधित सरपंच व ग्रामसेवकांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना पदमुक्त करण्याची मागणी केली होती. याप्रकरणी २६ मे २०२४ रोजी विस्तार अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीला भेट देऊन संबंधित निधीच्या खर्चाच्या अभिलेखांची तपासणी केली असून अहवाल सादर झाल्याचे सिनारे यांनी सांगितले. यावेळी सहाय्यक गटविकास अधिकारी राजेंद्र ठाकूर, आरपीआय तालुकाध्यक्ष आशिष शेळके यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी उपोषण मागे

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** : छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक लवकर उभारावे, या मागणीसाठी सुरू केलेले उपोषण राहाता तालुका पोलिस उपनिरीक्षक लेंडे व पुणतांबा ग्रामपंचायत अधिकारी बाबासाहेब मातंग यांच्याशी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर लेखी आश्वासन मिळाल्याने मागे घेण्यात आले. दुपारी चारनंतर झालेल्या चर्चेनंतर उपोषणार्थी आबासाहेब लक्ष्मणराव नळे यांनी लेखी पत्र स्वीकारून उपोषण सोडले. गावात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी सर्वपक्षीय नेते व कार्यकर्त्यांनी लोकवर्गणी केली आहे. छत्रपतींचा पुतळा आणून बंद पडलेल्या चांगदेवनगर शुगर मिल्सच्या जागेत सुरक्षेच्या दृष्टीने ठेवण्यात आला आहे.



मात्र, स्मारकासाठी कायमस्वरूपी जागेचा प्रश्न प्रलंबित असल्याने उपोषणाचा निर्णय घेतल्याचे आबासाहेब नळे यांनी सांगितले. ग्रामपंचायत सदस्य व समितीचे उपाध्यक्ष अनिलराव नळे यांनी उपोषणार्थींशी चर्चा करून मार्ग काढण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. ग्रामपंचायत अधिकारी बाबासाहेब मातंग यांनी दिलेल्या लेखी पत्रात वेशीजवळील जागेबाबत भूमी अभिलेख कार्यालयाने हरकतीचे दावे फेटाळले असले तरी न्यायालयीन वाद सुरू असल्याचे नमूद केले आहे. भाजी मंडईच्या जागेवर ग्रामपंचायतीचे नाव लावण्यासाठी तातडीने पाठपुरावा करण्यात येणार असून, दोन्ही जागांवरील अतिक्रमणे पोलिस व महसूल प्रशासनाच्या मदतीने काढण्यात येणार आहेत. यासाठी सुमारे दोन महिन्यांचा कालावधी लागू शकतो.

यावेळी भूषण वाघ, रामचंद्र पवार, पंकज नळे, दत्तात्रय धनवटे, सामाजिक कार्यकर्ते छगन जोगदंड, अशोक गायकवाड, विकास जोगदंड, दादा आग्रे, विकास गायकवाड, तोसिफ तांबोळी, शौकत शहा, निलेश दुर्गुडे, शिवा प्रधान, पोपट गडाख, रामदास काळे, ॲड. विकास जोंधळे, दत्ता परदेशी, सर्जेराव जाधव, तुषार शिंगाडे, दीपक कुऱ्हाडे यांच्यासह शिवप्रेमी नागरिक, ग्रामस्थ व चांगदेवनगर युवा मंचचे पदाधिकारी उपस्थित होते.

## उक्कलगावात ८० वा स्वातंत्र्यदिन ठिकठिकाणी उत्साहात

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : तालुक्यातील उक्कलगाव येथे देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन अतिशय उत्साही आणि देशभक्तीमय वातावरणात ठिकठिकाणी साजरा करण्यात आला. यानिमित्त गावात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांच्या उत्साही प्रभात फेरीने झाली. विद्यार्थ्यांनी संपूर्ण गावातून प्रभात फेरी काढत देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून सोडला. गावातील ठिकठिकाणी शैक्षणिक संस्थांमध्ये ध्वजारोहण पार पडले. उक्कलगाव विविध कार्यकारी सेवा संस्थेत संस्थेचे उपाध्यक्ष शरद थोरात यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संचालक मंडळ, बँकेचे शाखाधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामपंचायत कार्यालयात संरपच रविना शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. यावेळी उपसरपंच नितीन थोरात, ग्रामविकास अधिकारी, सर्व सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते. या शाळेत ध्वजारोहणाचा मान प्रगतशील शेतकरी आदिनाथ जगधने यांना देण्यात आला.शाळेचे माजी विद्यार्थी तथा प्राध्यापक सचिन नानासाहेब थोरात यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. वाकण वस्ती शाळेत प्रा. बाळासाहेब नळे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले, जिथे पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. पटेलवाडी जि. प. प्राथ. शाळेत माजी सभापती आबासाहेब गणपत थोरात यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रा. दत्तात्रय गंगाधर थोरात हे याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पटेलवाडी शाळेत झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त भाषणे सादर केली, तर त्यांच्या संगीत कवायतीने उपस्थितांची मने जिंकली.सुत्रसंचालन मुख्याध्यापक रत्नाकर काकडे यांनी केले तर, त्यास अनुमोदन सुनिता चित्ते, यांनी दिले.आभार प्रदर्शन शितल लामतुरे यांनी केले. याप्रसंगी प्रकाश थोरात, सदस्या मंदाबाई पारखे, कारभारी पारखे, मधुकर औचिते, अरुण यादव, गोरख गायके, अमोल पारखे, अनिल रजपूत, विकास रजपूत, बन्सी पारखे, रेश्मा निकम, सीमा डोंगरे, बंडू निकम, योगेश थोरात, वसंत दरंदले, सुरेश फुलपगार, विश्वदीप गोरे, शितल पारखे, मयुरी पारखे, भारती सोनवणे, पूजा पठारे यांच्यासह मोठ्या संख्येने पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# यल्लापूरच्या अर्बैल घाटात आकाश राजपूतचा खून

## पत्नीने केली सखोल चौकशीची मागणी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : राहता तालुका केलवड येथील २३ वर्षीय आकाश दशरथ राजपूत याचा कर्नाटकातील यल्लापूर तालुक्यातील मोलेपाल–अर्बैल घाट परिसरात संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. त्याच्या शरीरावर गंभीर जखमा आढळल्याने खुनाचा संशय व्यक्त होत असून, यल्लापूर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०३ व २३८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आकाश हा केलवड येथील ट्रकवर मदतनीस चालक म्हणून दुसऱ्या चालकासोबत कामानिमित्त कर्नाटकात गेला होता. १२ ऑगस्टच्या रात्री ८ ते १३ ऑगस्टच्या सकाळी ८.४५ दरम्यान अर्बैल घाट परिसरात ही घटना घडल्याचे पोलिस नोंदीनुसार समोर आले आहे. तक्रारदार रवी कृष्ण सिद्दी यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस उपनिरीक्षक राजशेखर वंदाली यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.



आकाशची पत्नी मनीषा राजपूत यांनी १५ ऑगस्ट रोजी राहाता तहसीलदारांना निवेदन देऊन घटनेची निष्पक्ष व सखोल चौकशी करून आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी केली. तसेच गरीब कुटुंबाला आर्थिक व कायदेशीर मदत देण्याची मागणी करण्यात आली आहे. यल्लापूर पोलिसांकडून तपास सुरू असून, आकाशसोबत गेलेल्या दुसऱ्या व्यक्तीचीही चौकशी सुरू असल्याची माहिती आहे. दरम्यान, केलवड ग्रामस्थांनी न्यायाच्या मागणीसाठी रास्ता रोको आंदोलन केले. प्रशासनाने शासकीय मदतीचे आश्वासन देत आंदोलन तात्पुरते स्थगित केले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासनही देण्यात आले. पंधरा दिवसांत मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा एकलव्य संघटनेचे प्रदेशाध्यक्ष योगेश सूर्यवंशी यांनी दिला.

## न्याय देणार, मला आठ दिवस द्या : डॉ. सुजय विखे

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**राहाता** : केलवड येथील अक्षय दशरथ रजपूत यांच्या मृत्यू प्रकरणाची जबाबदारी आपण घेतली असून, कुटुंबाला योग्य न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासकीय पातळीवर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. त्यासाठी मला आठ दिवसांचा वेळ द्या, असे आश्वासन भाजप प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिले.

डॉ. विखे पाटील यांनी रविवारी सायंकाळी केलवड येथे रजपूत कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी त्यांनी घटनेची सविस्तर माहिती घेतली. कर्नाटकातील घटनास्थळाची माहिती घेऊन संबंधित खासदार, पोलीस अधीक्षक व स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

राहाता पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपक सरोदे यांच्याशी संपर्क साधून कर्नाटकात तपासासाठी दोन पोलीस कर्मचारी पाठविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच अनुभवी पोलीस कर्मचारी आणि कुटुंबातील जबाबदार व्यक्तींनी घटनास्थळी जाऊन प्रत्यक्ष पाहणी करावी, अशा सूचनाही दिल्या. त्यानुसार सोमवारी पथक कर्नाटकला जाणार आहे.

या प्रकरणात कायद्याच्या चौकटीत निष्पक्ष कार्यवाही करून कुटुंबाला न्याय मिळवून देऊ. माझ्यावर विश्वास ठेवा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

**TENDER NOTICE**

**Supply, Installation, Testing & Commissioning Of Supply Of Tractor 50 HP 2 WD**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. **Kaalbhairavnath Farmers Producer Company Limited At. Akhtwade Ahilyanagar** is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart-mh.org,** in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is **25/08/2026 up to 2.00 PM.** Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

**Kaalbhairavnath Farmers Producer Company Limited At. Akhtwade Ahilyanagar**

**TENDER NOTICE**

**Supply, Installation, Testing & Commissioning Of Supply Of Tractor 29 HP and above 4 WD**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. **Bhagwatimata Farmers Producer Company Limited At. Nimgaonjali Ahilyanagar** is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart-mh.org,** in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is **25/08/2026 up to 2.00 PM.** Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

**Bhagwatimata Farmers Producer Company Limited At. Nimgaonjali Ahilyanagar**

**TENDER NOTICE**

**Supply, Installation, Testing & Commissioning Of Electronic Weighing Bridge 60 MT**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Babasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. **Kalbhairavnath Farmers Producer Company Limited At. Akhtwade Ahilyanagar** is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart-mh.org,** in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is **25/08/2026 up to 2.00 PM.** Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

**Kaalbhairavnath Farmers Producer Company Limited At. Akhtwade Ahilyanagar**

**TENDER NOTICE**

**Supply, Installation, Testing & Commissioning Of Electronic Weighing Bridge 50 MT**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. **Bhagwatimata Farmers Producer Company Limited At. Nimgaonjali Ahilyanagar** is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart-mh.org,** in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is **25/08/2026 up to 2.00 PM.** Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

**Bhagwatimata Farmers Producer Company Limited At. Nimgaonjali Ahilyanagar**

## पान १ वरुन

### उच्च न्यायालयाच्या लिपिक, टंकलेखक परीक्षेत गोंधळ!

काय निर्णय घेतं, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. छत्रपती संभाजीनगरचं नाही तर नांदेड, कल्याण, ठाणे, नाशिक, गोंदियामध्ये ऑनलाइन परीक्षेत गोंधळ होत आहे, की बोर्ड काम करत नाही, सर्व्हर काम करत नाही. १० मिनिटात लॉग आऊट होऊन जात आहे. म्हणजेच एका शिफ्टमध्ये असलेले विद्यार्थी फेल झाले. एवढा सगळा गोंधळ असताना ही परीक्षा कशी होऊ शकते, त्यामुळं ही परीक्षा पुन्हा घेतली गेली पाहिजे, असे दिपके म्हणाले. हा मुद्दा फक्त संभाजीनगरचा राहिलेला नाही, राज्याचा मुद्दा झाला आहे. जोपर्यंत फेरपरीक्षा घेण्याबाबत नोटिफिकेशन काढलं जात नाही आणि विद्यार्थ्यांना हार्डकॉपी मिळाली पाहिजे. परीक्षा देणारे विद्यार्थी बसून राहणार असतील तर मी देखील बसून राहणार असल्याचे ते म्हणाले.

### नागपंचमीला सर्पदंश 'अधिसूचित आजार' घोषित करा : आ. विक्रम पाचपुते

याचा अचूक डेटा शासनाला उपलब्ध होऊ शकतो. 'नोंद झाली तर डेटा, डेटा मिळाला तर संशोधन' सर्पदंशाचा प्रश्न केवळ तातडीने जीव वाचविण्यापुरता मर्यादित नसून उपचारानंतरच्या परिणामांचाही व्यापक अभ्यास होणे गरजेचे आहे. अपींळ-डपरज्ञश तशपो (अडत) आणि इतर उपचार घेतल्यानंतर रुग्णांच्या किडनी, मज्जासंस्था, स्नायू किंवा अन्य अवयवांवर दीर्घकालीन परिणाम होतात का, याबाबत दीर्घकालीन संशोधनाची आवश्यकता आहे. सर्पदंशातून बचावलेल्या रुग्णांच्या पुनर्वसनाची गरज, उपचारानंतरच्या गुंतागुंती आणि दीर्घकालीन परिणामांचा अभ्यास करण्यासाठी प्रमाणित आणि व्यापक आकडेवारी महत्त्वाची ठरणार आहे. उपचार व्यवस्थेलाही मिळणार दिशा सर्पदंश अधिसूचित आजार झाल्यास सर्पदंशाचे हॉटस्पॉट ओळखणे, रुग्णालयांमध्ये लसीचा चा पुरेसा साठा ठेवणे, आरोग्य यंत्रणेचे नियोजन करणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांची आखणी करणे अधिक प्रभावीपणे शक्य होईल. ३० जून रोजी विधानसभेत मी हा विषय उपस्थित केला होता. त्यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. उद्या नागपंचमी आहे. सर्पदंशाला अधिसूचित आजार घोषित करण्यासाठी यापेक्षा अधिक समर्पक दिवस असू शकत नाही. नागपंचमीच्या दिवशी हा निर्णय झाला तर तो केवळ शासन निर्णय न राहता सर्पदंश प्रतिबंध, योग्य उपचार आणि जनजागृतीचा राज्यव्यापी संदेश बनेल, असे आमदार विक्रम पाचपुते यांनी म्हटले आहे. नोंद झाली तर डेटा मिळेल, डेटा मिळाला तर संशोधन होईल आणि संशोधन झाले तर उपचार अधिक प्रभावी होतील. सर्पदंशामुळे होणारे टाळता येण्याजोगे मृत्यू कमी करण्यासाठी हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरू शकते, असेही पाचपुते यांनी स्पष्ट केले. सर्पदंशाला अधिसूचित आजाराचा दर्जा देऊन महाराष्ट्राने सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रात पुढाकार घ्यावा आणि नागपंचमीच्या दिवशीच हा निर्णय जाहीर करावा, अशी मागणी आ. विक्रम पाचपुते यांनी केली आहे.

### आई-मुलाला काठीने मारहाण, २५ हजारांचा ऐवज लंपास

मुद्देमाल असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.घटनेची माहिती मिळताच श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पहाटे २.१५ वाजता पोलिसांना घटनेची माहिती मिळाल्यानंतर अवघ्या अर्ध्या तासात पोलीस घटनास्थळी दाखल झाले. उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनाही घटनेची माहिती देण्यात आली असून तपासासाठी पोलिसांनी विविध अंगांनी चौकशी सुरू केली आहे.या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ७५४/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(६), ३३१(६), ३३१(७) व ३(५) अन्वये तीन अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक रसूल शेख करीत आहेत. मध्यरात्री घरात घुसून कुटुंबीयांना मारहाण करत चोरी करणाऱ्या चोरट्यांचा शोध घेणे हे पोलिसांसमोरचे आव्हान असून, परिसरातील नागरिकांमध्ये या घटनेमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### दबावातून फिर्याद की दहशतीमुळे दहशतीमुळे माघार..?

अमोल भारती यांनी सांगितल्याचा आरोपही तिने केला. सागर बेग, बाबू साळवे आणि सोनू बेग यांच्याविरुद्ध दबावाखाली फिर्याद देण्यास भाग पाडण्यात आल्याचे तिने स्पष्ट केले. या प्रकरणासंदर्भात श्रीरामपूर न्यायालयातही आपण जबाब दिल्याचे तिने सांगितले. दरम्यान, दुसऱ्या पत्रकार परिषदेत प्रकाश चित्ते यांनी पूर्णपणे वेगळी बाजू मांडली. अत्याचाराची तक्रार दाखल केल्यानंतर संबंधित महिलेने आता 'असे काही घडलेच नाही' अशी भूमिका घेण्यामागे कथित बेग टोळीची दहशत असावी, असा आरोप त्यांनी केला. महिलेची फिर्याद दाखल करण्याशी आपला कोणताही संबंध नसल्याचे चित्ते यांनी स्पष्ट केले.या आरोप-प्रत्यारोपातील सत्य समोर आणण्यासाठी स्वतःसह संबंधित महिलेच्या मोबाईलचे कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) तपासण्यात यावेत, अशी मागणीही त्यांनी केली. शहरातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करताना गंभीर गुन्ह्यांतील प्रमुख आरोपी मोकाट असल्याचा आरोप त्यांनी केला. तीन महिन्यांपासून बेपत्ता असलेल्या तरुणीचा अद्याप शोध लागलेला नसल्याचा मुद्दाही चित्ते यांनी उपस्थित केला. आकाश दुबैय्या हत्या प्रकरणाचा संदर्भ देत या प्रकरणाची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी श्रीरामपूरला येऊन संबंधितांची भेट घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली. या परस्परविरोधी दाव्यांची सत्यता तपासण्यासाठी पोलिसांकडून फिर्याद नोंदविण्याची संपूर्ण प्रक्रिया, संबंधितांचे मोबाईल संभाषण व सीडीआर, पोलिस ठाण्यातील उपलब्ध नोंदी तसेच न्यायालयात नोंदविण्यात आलेला जबाब यांची निष्पक्ष पडताळणी होणे महत्त्वाचे ठरणार आहे. आरोपांमधील सत्य-असत्य तपासातूनच स्पष्ट होणार असून, सध्या दोन्ही बाजूंचे दावे स्वतंत्र आरोप म्हणूनच समोर आले आहेत. 'माझ्या जीवाला धोका' : चित्ते आकाश दुबैय्या हत्या प्रकरणानंतर आपल्यासह आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, रवी पाटील, चंदू आगे यांच्यासह सुमारे दहा जणांच्या जीवाला धोका असल्याचा दावा चित्ते यांनी केला. आपला अपघाती अथवा संशयास्पद मृत्यू झाल्यास पत्रकार परिषदेत केलेल्या निवेदनाची दखल घेऊन पोलिसांनी संबंधितांविरुद्ध योग्य ती कारवाई करावी, अशी मागणीही प्रकाश चित्ते यांनी केली. आकारी पडीत शेतकऱ्यांच्या जमिनी मिळणारदाखल करण्यात आले. त्यामुळे आंदोलनाची तीव्रता वाढली. खोकरफाटा व उंदिरगाव येथे रास्तारोको करण्यात आला, तर श्रीरामपूर शहरात कांदा मार्केटजवळ पाण्याच्या टाकीवर चढून 'शोले स्टाईल' आंदोलन करण्यात आले. दरम्यान, पालकमंत्री विखे पाटील यांनी स्थानिक कार्यकर्त्यांचे शिष्टमंडळ उपोषणस्थळी चर्चेसाठी पाठविले; मात्र त्यातून तोडगा निघाला नाही. त्यानंतर खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन अँड. अजित काळे यांच्याशी चर्चा केली व प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी राधाकृष्ण बोरकर, सदा पटारे, शिवाजी दौंड आदी उपस्थित होते. भाजपचे माजी तालुकाध्यक्ष बबनराव मुठे यांनी विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष विधीज्ञ अजित काळे यांची तब्येत ढासळल्यानंतरही प्रशासनाकडून आंदोलनाची दखल घेतली जात नाही हे पाहून शेतकरी रविवारी दुपारनंतर चिडले. त्यांनी उंदिरगाव आणि खोकर फाटा येथे रास्ता रोको आंदोलन केले. तर कृषी उत्पन्न बाजार समितीतील पाण्याच्या टाकीवर चढून काही तरुण शेतकऱ्यांनी शोले स्टाईल अनोखे आंदोलन केले. अँड अजित काळे यांच्यासह शेतकऱ्यांचे उपोषण स्थगितअँड अजित काळे यांच्या समवेत उपोषणास बसलेल्या सचिन सुखदेव वेताळ ,बाबासाहेब सयराम वेताळ, शालीनीताई झुराळे, सुनीता गोरक्षनाथ वेताळ, सुजाता गंगाधर वेताळ, कमल सुनील वेताळ, प्रमिला ताके, विठाबाई राजेंद्र आसने,मंदाबाई बाळनाथ गाढे, कुसुम लक्ष्मण गाढे, विजया सोपानराव नाईक , आशाबाई बबराव नाईक, अनिता बापूसाहेब गोरे,बाप्पुसाहेब बाबासाहेब गोरे, राजेंद्र गुलाब गोसावी, बाबासाहेब आंबादास भोंडगे, बाळासाहेब दगडू आसने, ठकसेन आण्णासाहेब मुठे, चंद्रभागा बाळू पंडित, शांताबाई अशोक पंडीत, जाईबाई बाळासाहेब आदिक, लताबाई ज्ञानदेव आदिक, मुक्ताबाई अण्णासाहेब मुठे, विजया बाबासाहेब भोंडगे, आदी महिला पुरुषांनी उपोषण स्थगित केले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते त्यांनी लिंबू पाणी घेतले.

# रावसाहेब खेवरेंमुळे शिवसेनेची ताकद वाढेल : उपसभापती सचिन अहिर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : ब खेवरे यांच्यासारखे निष्ठावंत कार्यकर्ते आणि राहुरीतील शिवसैनिकांची एकजूट हीच शिवसेनेची खरी ताकद आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात राहुरीसह अहिल्यानगर जिल्ह्यातही भगवा अधिक जोमाने फडकत राहील, असा विश्वास विधानपरिषद उपसभापती सचिन अहिर यांनी व्यक्त केला.




सचिन अहिर यांच्या शिर्डी-शिंगणापूर दौऱ्यानिमित्त राहुरी येथे शिवसेना नेते रावसाहेब खेवरे यांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना सचिन अहिर यांनी राहुरीतील शिवसैनिकांच्या एकजुटीचे आणि रावसाहेब खेवरे यांच्या कार्याचे कौतुक केले. भगवा केवळ झेंडा नाही, तो शिवसैनिकांच्या निष्ठेचा आणि संघर्षाचा रंग आहे. खेवरे यांच्यासारखे निष्ठावंत कार्यकर्ते आणि त्यांच्यासोबत खंबीरपणे उभे असलेली शिवसैनिकांची फळी पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आणखी मजबुत होईल.

विधान परिषदेचे उपसभापती सचिनअहिर यांच्या उपस्थितीने राहुरीतील शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी रवीभाऊ मोरे, राहुल चोथे, धीरजभैय्या पानसंबळ, डॉ संजय म्हसे,हमीद पटेल, सुनील शेलार, प्रशांत शिंदे, राजेंद्र गुंजाळ, दिपक पंडित, अशोक कल्हापुरे, विजय शिरसाठ, पोपट शिरसाठ, शहाजी वराळे, कैलास कोहकडे, रामदास खेमनर, अशोक खेवरे, सतीश माने, रवींद्र चौधरी, उत्तम पवार, सचिन चौधरी, शुभम चौधरी, राजेंद्र शिरसाठ, कैलास अडसुरे, संदीप बाचकर, सोमा पागिरे, गणेश कदम, मंगेश शेटे, जबाजी बाचकर, अमर धाडगे, राजेंद्र गव्हाणे, ओंकार खेवरे, अक्षय ढोकणे, किरण घाटोळे, सुरज पोटे, दिपक पेंढारे, सौरभ तमनर, योगेश कोहकडे यांच्यासह पदाधिकारी, मान्यवर व शेकडो शिवसैनिक उपस्थित होते.

## मदर तेरेसा इंग्रजी शाळेत स्वातंत्र्यदिन उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** शहरातील भारतरत्न मदर तेरेसा इंग्रजी शाळेत स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. नगराध्यक्ष संजय जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी उपनगराध्यक्ष अमोल जगताप, नगरसेवक नवनाथ कानडे, सय्यद अख्तर, प्रीती मेहरे, कावेरी पाटील, ए. बी. गायकवाड यांच्यासह पालक-शिक्षक समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यसैनिक व संत मदर तेरेसा यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी पथसंचलन, सर्वधर्मीय प्रार्थना, कवायती, स्वागत नृत्य, देशभक्तीपर गीते, विविध वेशभूषा, पिरॅमिड व लेझीमचे सादरीकरण केले. मुख्याध्यापिका अनुजा कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. संजय जाधव व वैशाली पाठे यांनी शुभेच्छा दिल्या. फादर विल्फ्रेड सल्ढाणा यांनी आभार मानले. सूत्रसंचालन अनम खान, दीपली भोसले व जया माघाडे यांनी केले. वंदे मातरम् समूहगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## प्रवाशांनी साखळी ओढल्याने अनेक प्रवासी बचावले !

### रेल्वे प्रशासन मात्र ढिम्म

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपुर :** स्वातंत्र्य दिनाच्या सुट्टीला जोडून आलेल्या सुट्ट्यामुळे शेगाव रेल्वे स्थानकावर प्रवाशांचे मोठी गर्दी ,त्याचप्रमाणे नागपूर पुणे सुपरफास्ट एक्सप्रेस मधून शेगाव स्थानक येताच प्रवाशांची उतरण्याची लगबग, शेगाव स्थानकात एक्स्प्रेस थांबताच गाडीतून उतरणारे व पुढच्या प्रवाशासाठी जाणाऱ्यांची एकम झुंबड व रेटारेटी सुरु झाली. प्रवाशांची चढ - उतार सुरू असतानाच गाडी भुसावळच्या दिशेने जाण्यासाठी सुरू झाली. प्रवाशांचा प्रचंड आरडा ओरड सुरू झाला कुणाचे सामान गाडीत राहिले तर काही प्रवासी प्लॅटफॉर्मवर राहिले तर काही गाडीतून उतरू शकले नाहीत त्यातच एक वृद्ध महिला प्लॅटफॉर्म व गाडी यात अडकली काही लोकांनी सदर महिलेला वाचविले.गाडीला शेगाव स्थानकात केवळ दोन मिनिटांचा थांबा असल्याने व प्रचंड गर्दीमुळे हा गोंधळ झाला. ही घटना १५ ऑगस्ट शनिवार रोजी रात्री शेगाव रेल्वे स्थानकात घडली.

रेल्वे स्थानकात प्रवाशांची सुरक्षितता हा सर्वात महत्त्वाचा विषय आहे. प्रसंगानुरूप गर्दीचे नियोजन करताना एखादा मिनिट गाडी विलंबाने सोडली तरी त्यात फारसे बिघडण्यासारखे नाही. अनेक वेळा कोणत्या ना कोणत्या कारणाने गाड्या लेट होतात त्याबद्दल प्रवासी सहसा तक्रार करत नाहीत, येथे तर प्रवाशांचा प्रवास वाऱ्यावर सोडून दिल्यासारखा आढळून येत होता. रेल्वेचा प्रवाशांच्या मदतीसाठी असलेला १३९ हा क्रमांक फारसा उपयोगाचा नाही तेथे आपणास अन्नसेवेबद्दल तक्रार असल्यास आपला पीएनआर क्रमांक, तसेच आपल्या प्रवासामध्ये काय सेवा हवी, पाणी आहे का, संडास स्वच्छ आहे का अशा प्रकारचे प्रश्न विचारलेले असतात. गाडी चालू असताना घडणारी गंभीर घटना वरिष्ठांपर्यंत पोहोचवण्याची कोणतीही सोय या क्रमांकावर नाही. प्रवाशांची तक्रार ऐकून घेण्याऐवजी ॲपवरून विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देताना बटणे दाबता- दाबता ॲप वापरणारा हैराण होतो. शेगाव येथील संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांनी आपल्या वरिष्ठांना तरी ही घटना सांगितली आहे की नाही हे समजायला काहीही मार्ग नाही.

## टाकळीभान येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे ८० वा स्वातंत्र्यदिन शाळा, ग्रामपंचायत तसेच विविध संस्थामध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्रथमच ग्रामपंचायतसह काही शाळांमध्ये एकल महिलांना ध्वजारोहनाचा बहु बहुमान दिला गेला. यावेळी स्वातंत्रदिनाचा विजय असो, वंदे मातरम आदी घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

न्यु इंग्लिश स्कुल व कै.आण्णासाहेब पटारे पाटील कनिष्ठ महाविद्यालयात माजी रयत सेवक प्रा.कार्लस साठे व त्यांच्या सुविद्य पत्नी सिमा साठे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

सेवा संस्थेत चेअरमन राहुल पटारे, पोलीस दुरक्षेत्र येथे कुमार बैसाणे, जि.प.प्राथमीक शाळा येथे शंकुतला पटारे व रंजना पवार, ग्रामपंचायत कार्यालय येथे मंगल जाधव व सविता चौधरी, लक्ष्मीवाडी जि.प.शाळेत आशाबाई सटाले व मंगल खरात, बनकर वस्तीशाळेत अनिता लोखंडे व आश्विनी म्हस्के, दाभाडे वस्ती शाळेत सोनाली आसने व राणी रणनवरे, गटकळ इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये सुनंदा कोकणे, प्राईड



ॲकेडमी मध्ये प्रमोद भोसले, पोष्ट ऑफीस येथे पो.कॉ.महेश बडाख व पो.कॉ.नितीन पटारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## पो. हे. कॉ. रमेश तगरे यांना कारागृह पोलीस पदक सन्मानित

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील रमेश गिताराम तगरे यांना नूकतेच कारागृह विभागामध्ये बजावलेल्या प्रशंसनीय सेवेबद्दल पदक व सन्मानचिन्हे सन्मानीत करण्यात आले.

रमेश तगरे हे कारागृह विभागात जायचे २००० साली भरती होऊन ठाणे सेन्ट्रल जेल, मुंबई सेंट्रल जेल, तळोजा सेन्ट्रल जेल याठिकाणी आरोपींना सोबत राहून सुद्धा खूप प्रमाणिक सेवा करुन आज त्यांना सन्मानीत करण्यात आले. सध्या ठाणे मध्यवर्ती कारागृहात हवालदार या पदावर कार्यरत



आहे. कारागृह विभागात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांना अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा सुहास वारके यांच्या हस्ते, व योगेश देसाई कारागृह महानिरीक्षक, नितिन वायचळ तुरूंगाधिकारी, श्रीमती राणी भोसले अधिक्षक ठाणे कारागृह, सुभाष निर्मळ विसापूर कारागृह अधिक्षक यांच्या उपस्थितीत पदक व सन्मानचिन्हे प्रशस्तीपत्र देवून सन्मानीत करण्यात आले.त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल पोलीस वतुळातून तसेच श्रीरामपूर तालुका व टाकळीभानसह पंचक्रोशीतून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

## पीडित कुटुंबाला न्यायासाठी आमरण उपोषण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** गुन्हा रजि. नं. २६३/२०२६ मधील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, तसेच पीडित कुटुंबाच्या जीवितास धोका असल्याने त्यांना कायमस्वरूपी पोलीस संरक्षण द्यावे, या मागणीसाठी लहुजी शक्ती सेनेचे प्रवीण वैरागर व पीडित कुटुंबीयांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाचा आज दुसरा दिवस असून, अद्याप कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याने उपोषणस्थळी भेट दिलेली नसल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले. पीडित कुटुंबावर गुन्हा मागे घेण्यासाठी दबाव, धमकी किंवा दहशत निर्माण करणाऱ्यांवर स्वतंत्र गुन्हे दाखल करावेत, तसेच आरोपींना आश्रय अथवा मदत करणाऱ्यांची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तपासात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांचीही चौकशी करावी, अशी मागणी आहे. सरपंच व पोलीस पाटील यांनी पदाचा गैरवापर केल्याचे निष्पन्न झाल्यास त्यांच्यावरही कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. न्याय मिळेपर्यंत आमरण उपोषण मागे घेणार नाही, असा निर्धार प्रवीण वैरागर व पीडित कुटुंबीयांनी व्यक्त केला.

## विद्यार्थ्यांच्या माध्यमातून देशाचे भविष्य घडविण्याचे कार्य कौतुकास्पद : कर्नल भरत भल्ला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा संकुलात देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. पुणे येथील मिलिटरी इंजिनिअरिंग कॉलेजचे कर्नल भरत भल्ला यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण झाले.

यावेळी मार्गदर्शन करताना कर्नल भरत भल्ला म्हणाले, अनेक क्रांतिकारकांच्या बलिदानामुळे आज आपण स्वतंत्र भारतात श्वास घेत आहोत. त्यांच्या त्यागाचा सन्मान राखणे हीच खरी श्रद्धांजली आहे. पालक विद्यार्थ्यांसाठी घेत असलेल्या कष्टांची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी मन लावून अभ्यास करावा. मिलिटरी पॅटर्नवर आधारित त्रिमूर्ती पावन



प्रतिष्ठान विद्यार्थ्यांच्या माध्यमातून देशाचे भविष्य घडविण्याचे मोलाचे कार्य करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास कर्नल भल्ला यांच्या पत्नी बबीता भल्ला, नाशिक क्राईम ब्रँचच्या पोलीस उपअधीक्षक सीमा परिहार, संस्थेच्या अध्यक्षा ॲड. सुमतीताई साहेबराव घाडगे पाटील, विश्वस्त शरदतात्या घाडगे पाटील, सौ. अनिता गाढवे, चेतन चव्हाण पाटील, प्राचार्य सोपान काळे, दिपाली बाविस्कर, जोसेफ, समन्वयक दत्तात्रय वांढेकर, डॉ. अनुराधा गोरे आदी उपस्थित होते.

सैनिकी बँडच्या संचलनानंतर सुमारे ७०० विद्यार्थ्यांनी मान्यवरांना मानवंदना दिली. अमर जवान स्तंभ व शिक्षणमहर्षी साहेबरावजी घाडगे पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. यावेळी गुणवंत विद्यार्थी तसेच राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

आर्चरीचे राष्ट्रीय पंच अभिजीत दळवी यांच्या पथकाने आर्चरी, तर रायफल शूटिंग प्रशिक्षकांच्या पथकाने रायफल शूटिंगचे थरारक प्रात्यक्षिक सादर केले. सीमा परिहार यांनी विद्यार्थ्यांमधील शिस्त व संस्कारांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य सोपान काळे यांनी केले. सूत्रसंचालन उपप्राचार्य अरविंद देशमुख व प्रा. लक्ष्मण दळे यांनी केले, तर महादेव काकडे यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.


### नावात बदल

मी, शीतल निलेश जोशी, वय ४६ वर्षे, रा. नेवासा बु., ता. नेवासा, जि. अहिल्यानगर, प्रतिज्ञापूर्वक जाहीर करते की माझे विवाहापूर्वीचे नाव संगिता अरुण महाजन होते व विवाहानंतर शीतल निलेश जोशी असे आहे. ही दोन्ही नावे एकाच व्यक्तीची असून अन्य कोणतीही व्यक्ती नाही.

**प्रतिज्ञापत्र क्र. :** २६५२ २४२० ६१२६ ८१०० २३४२ ०५

### CHANGE OF NAME

Old name- PRAFUL AASARAM BUDRUK. New name. - SUVARNLATA DILIPKUMAR MIRIKAR. Both the person are same reference to AADHAR no. 373680694873


## पान १ वरुन

### बियाणे घेऊन जाणाऱ्या शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू

आहे. त्यांना पुढील उपचारासाठी कोपरगाव येथे दाखल करण्यात आले आहे.दरम्यान, या अपघातामुळे कोपरगाव कोळपेवाडी मार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या मार्गावर अनेक ठिकाणी स्पीड ब्रेकर नसल्याने वाहनांचा वेग मोठा असतो. त्यातच मोठ्या प्रमाणात वाळू वाहतूक करणारी वाहने या रस्त्यावरून धावत असून, अनेक ठिकाणी रस्त्यावर वाळू सांडलेली असते.रस्त्यावर सांडलेल्या वाळूमुळे दुचाकी घसरण्याचा धोका वाढत असून, अशा परिस्थितीत अपघाताला निमंत्रण मिळत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रशासनाने या मार्गाची तातडीने पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी स्पीड ब्रेकर बसवावेत, तसेच रस्त्यावर सांडलेली वाळू हटवून वाळू वाहतुकीवर योग्य ती नियंत्रणात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## माजी नगरसेवक नितीन शेळके यांचा उल्लेखनीय कार्याबद्दल सत्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** साईबाबांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेल्या शिर्डी नगरीचे भूमिपुत्र, माजी नगरसेवक आणि ख्यातनाम हॉटेल व्यावसायिक नितीन पंढरीनाथ शेळके यांचा त्यांच्या उल्लेखनीय राजकीय, सामाजिक आणि धार्मिक कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. शिर्डीच्या विकासात आणि समाजकारणात नेहमीच अग्रेसर राहणारे नितीन शेळके हे नाव सध्या शिर्डीच्या राजकीय वर्तुळात आणि जनतेमध्ये आदराने घेतले जात आहे.विखे पाटलांचे अत्यंत विश्वासू आणि उजवा हात नितीन शेळके यांची ओळख केवळ एक माजी नगरसेवक म्हणून नाही, तर महसूलमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांचे शिर्डीतील अत्यंत विश्वासू आणि 'उजवा हात' म्हणून आहे.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

### नशिबाची परिक्षा

**सोमवार दि . १७ ऑगस्ट २०२६**

#### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १५० २४० ३३० | ६-१ | १४६ १२८ ११९ | जोड ६०-४१-२९-३५-१८ |

#### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १९० २८० ४६० | ०-३ | १२० ६७० ५८० | जोड ०६-२३-१५-४७-३९ |

#### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४९ २४८ ६८० | ४-६ | १२३ १५० ६०० | जोड ४१-३६-५२-७८-६९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

### शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 03/08/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 10/08/2026 | 234 90 569 | 170 8 | | | |

द·ख·ल



## स्वच्छ, सुंदर, हरित व विकसित शहराची संकल्पना प्रत्यक्षात आणू : महापौर गाडे

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महापालिका प्रशासकीय इमारतीच्या परिसरात महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत उपस्थितांनी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास मनपा आयुक्त यशवंत डांगे, मनपा महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती वर्षा सानप, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, उपायुक्त मेहर लहारे, शहर अभियंता मनोज पारखे, इंजिनीअर सुरेश इतापे, मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुदगल, अग्निशामक दल विभाग प्रमुख शंकर मिसाळ, अनिल लोंढे, सतीश ताठे यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापालिकेच्या अग्निशामक दल विभागाचे प्रमुख शंकर मिसाळ यांनी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते गौरव करण्यात आला असून, हा संपूर्ण अहिल्यानगर महानगरपालिकेसाठी अभिमानाचा क्षण आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी आणि कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत नागरिकांना उत्तम नागरी सुविधा देण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहनही महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.



## ग्लोबल वॉर्मिंगचे संकट वाढत आहे उपमहापौर ॲड. धनंजय जाधव

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जुन्या महानगरपालिका कार्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमास उपायुक्त शहनवाज तडवी, अशोक साबळे, प्रभाग अधिकारी राकेश कोतकर, किशोर कानडे, आदिम शेख, नंदू नेमाने यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे पूर्ण होत असून, या काळात भारताने शिक्षण, क्रीडा, सांस्कृतिक, तंत्रज्ञान तसेच विविध क्षेत्रांमध्ये मोठी प्रगती केली आहे. देश विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असताना संपूर्ण जगासमोर ग्लोबल वॉर्मिंगचे मोठे संकट निर्माण झाले आहे.पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपणाबरोबरच लावलेल्या वृक्षांचे संवर्धन करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने किमान दोन वृक्ष लावून त्यांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले.



## दहेश्वर विद्यालयात ८० वा स्वातंत्र्य दिन साजरा

**अमरापूर:** श्री मारुतरावजी घुले पा शिक्षण संस्थेचे दहेश्वर माध्यमिक विद्यालय दहिफळ जूने ता शेवगाव विद्यालयात ८० वा. स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष नंदु पा भोसले होते प्रमुख पाहुणे दहिफळ जूने चे संरपच सौ छायाताई लोंढे, संस्थेचे विश्वस्त पंडित काका भोसले, बाळूसिग मुराडे हे उपस्थित होते. सौ. छायाताई लोंढे पा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.कु. सारिका जाधव, संचिता काटे, अनुष्का दळे, तन्वी दळवी दिया रणदिवे, प्रियल गांधी, आदित्य काळे, समर्थ हाके, करचे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले या प्रसंगी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले संस्थेचे विश्वस्त पंडित काका भोसले यांनी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देताना म्हटले की भारताला पूर्ण विकसित करण्यासाठी आजच्या तरुण पिढीची भुमिका महत्वाची आहे. या प्रसंगी कल्याण भोसले, कलिंदर चाचा शेख बाळूसिग मुराडे, जावेद भाई शेख, रामकिसण लोंढे, गंगाधर हाके, भिमराव गायकवाड, नंदु पा भोसले, कांबळे, विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक अंबादास नन्नावरे, विकास राऊत, श्रीमती प्रमिला बोडखे मॅडम, रणजित जाधव, यशोदास वाघमारे, भाऊसाहेब बर्डे, विशाल जोशी, राजाराम लिंभोरे, देविदास आरगळे, लिंभोरे गोरख, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाघमारे सरांनी केले आणि आभार जाधव सरांनी व्यक्त केले.



## दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला ‘काजवा’ची साथ; शैक्षणिक साहित्याचे वाटप

**अहिल्यानगर :** शिक्षणाची आवड आणि गुणवत्ता असूनही आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, या उद्देशाने कार्यरत असलेल्या ‘काजवा संस्था’ यांच्या वतीने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून अकोले तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळा देवीची वाडी (लाडगाव) तसेच गुणवत्तापूर्ण शैक्षणिक उपक्रमांमुळे नावारूपास येत असलेल्या जिल्हा परिषद शाळा रणद बुद्रुक (रंधा धबधबा परिसर) येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे संच देण्यात आले. या संचामध्ये वह्या, पेन, पेन्सिल, चित्रकलेचे साहित्य तसेच खाऊचा समावेश होता.काजवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रविण धांडे व ट्रस्टी सपना धांडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी काजवा संस्थेचे पदाधिकारी रुपाली काळे, हरिदास धांडे, अंकुश काळे, योगीता सूर्यवंशी, रजनी धांडे उपस्थित होते.संस्थेच्या माध्यमातून मोफत आरोग्य शिबिरे, महिला सबलीकरण, संस्कृती संवर्धन आणि रोजगार निर्मिती यांसारख्या क्षेत्रांतही सातत्याने काम केले जात असल्याचे संस्थापक अध्यक्ष प्रविण धांडे यांनी सांगितले.

# नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयासमोर शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे उपोषण

## क्लेरा ब्रुसच्या न्यायप्रविष्ट जागेत पूर्वसूचना न देता कारवाई करुन नुकसान केल्याचा आरोप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील क्लेरा ब्रुस बॉईज हायस्कूल मैदानावरील जागेच्या ताब्यावरून वाद निर्माण झाला असून, या प्रकरणात सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. अनेक वर्षांपासून या जागेवर व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे स्टीफन दिलीप पंचमुख यांनी कोणतीही कायदेशीर नोटीस अथवा पूर्वसूचना न देता आपले दुकान, पत्र्याचे शेड, गोठा व लोखंडी पिंजरे जमीनदोस्त केल्याचा आरोप केला आहे. तसेच त्यांच्या ताब्यातील जनावरे व कुत्रे परस्पर ताब्यात घेण्यात आले असून, त्यातील काही जनावरे बेपत्ता असल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

या कारवाईत सुमारे ३० ते ३५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा पंचमुख यांनी केला आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, आर्थिक नुकसानीची भरपाई द्यावी आणि संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, या मागणीसाठी शिवसेना सामाजिक न्याय विभागाच्या वतीने नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले. यावेळी जिल्हाप्रमुख विनोद साळवे, तक्रारदार स्टीफन पंचमुख, भिंगार शहरप्रमुख कल्याण गायकवाड, नगर शहर उपप्रमुख दीपक कांबळे, संजय पाठक आदी सहभागी झाले.

पंचमुख यांच्या म्हणण्यानुसार, क्लेरा ब्रुस बॉईज हायस्कूल परिसरातील संबंधित जागा वाईडर चर्च मिनिस्ट्रीज या संस्थेने २२ नोव्हेंबर २०१४ रोजी ९९ वर्षांच्या करारावर उदरनिर्वाहाचे साधन निर्माण करण्यासाठी वापरण्यास दिली



होती. त्यानंतर त्यांनी येथे पत्र्याचे शेड, जनावरांसाठी गोठा, कुत्र्यांसाठी लोखंडी पिंजरे आणि छोटे दुकान उभारले होते. याच व्यवसायातून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू होता.

क्लेरा ब्रुस मैदानाच्या मालकी हक्काचा वाद न्यायालयात प्रलंबित असून, न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित जागा तहसीलदारांच्या ताब्यात ठेवण्यात आल्याचे पंचमुख यांनी सांगितले. असे असतानाही आपला प्रत्यक्ष ताबा कायम असल्याचा त्यांचा दावा आहे. १ एप्रिल २०२६ रोजी पत्नी गर्भवती असल्याने आपण गेवराई येथे गेलो असताना सामाजिक वनीकरण विभागाच्या वनक्षेत्रपाल मनीषा सरोदे यांनी फोन करून शेड, दुकान, गोठा व पिंजरे हटविण्याची सूचना केली. जागेचा वाद न्यायालयात प्रलंबित असल्याचे सांगूनही अधिकाऱ्यांनी जागा रिकामी करण्यासाठी दबाव आणल्याचा आरोप पंचमुख यांनी केला.

त्यानंतर ४ एप्रिल रोजी आपण गेवराई येथे असतानाच सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कोणतीही कायदेशीर नोटीस अथवा संमती न घेता दुकान, पत्र्याचे शेड, गोठा व लोखंडी पिंजरे पाडून टाकल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी गायी, वासरे आणि विविध जातींच्या कुत्र्यांना ताब्यात घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यातील काही जनावरे अद्याप बेपत्ता असल्याचा दावा पंचमुख यांनी केला आहे.

कारवाईनंतर संबंधित जागेवर नांगरणी करून सपाटीकरण करण्यात आले तसेच तारेचे कुंपण व लोखंडी गेट उभारून जागेचा ताबा घेतल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या प्रकरणी सहाय्यक वनसंरक्षक एस. ए. केसरकर यांनी चौकशी सुरू असून १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र त्यानंतरही कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचे पंचमुख यांचे म्हणणे आहे.

संबंधित विभागीय वन अधिकारी, सहाय्यक वनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी, वनक्षेत्रपाल तसेच सामाजिक वनीकरण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कायदेशीर नोटिसा पाठविल्याचेही त्यांनी सांगितले. यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कुटुंबासह उपोषण केल्यानंतर चौकशी करून नियमानुसार कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे सांगण्यात आले. मात्र अद्याप लेखी निर्णय किंवा माहिती मिळालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दुकान, गोठा, जनावरे आणि व्यवसायाचे साधन नष्ट झाल्याने कुटुंबावर उपासमारीची वेळ आली असून प्रशासनाने तातडीने न्याय द्यावा, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी, अशी मागणी पंचमुख यांनी केली आहे.

## चितळेरोडवर सकाळी रोज वाहते गटाराचे पाणी !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** येथील चितळेरोडवर १५ दिवसापासून रोज सकाळी गटाराचे पाणी वाहते त्याचा त्रास हा सर्वसामान्य पादचारी,गाडीवाले व येथील व्यवसायिकांना होत आहे अनेक वेळा अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त,मनपा प्रशासन,महावितरण कार्यालय,प्रभाग अधिकारी व आरोग्य अधिकारी, महापौर उपमहापौर याना भेटून व अनेक वेळा निवेदने देऊन हि त्रास बंद व्हायला तयार नाही, येथील गटार चौकअप झाली कि ६ महिन्यात पुन्हा हे पाणी वाहायला सुरुवात होते.

तेलीखुट पासून दत्त मंदिर चौपाटी कारंजा असा मोठा पावसाळी नाला चितळेरोड पोलिस चौकी समोर सदर नाल्यावर महावितरणची डी पी मुळे चार वर्षापासून पूर्णपणे चोकअप आहे. सध्या महावितरणच्या डीपी मुळे नाल्याची साफ सफाई करता येत नाही.मनपाचे आरोग्य विभागाचे अनेक वेळा प्रयत्न केले त्यास यश आले नाही. त्यामुळे नाल्यातील पाणी रस्त्यावर वाहते व नालीमधील घाण पाणी पावसाळया मध्ये चितळेरोड रस्त्यावर वाहते. त्यामुळे नागरिकांना व व्यावसायिकांना त्रास होतो व मनपा ची बदनामी होते.मनपा प्रशासनाने व आम्ही



सदर डिपी बाबत महावितरणच्या अभियंता यांना समक्ष भेटून तसेच लेखी अनेक तक्रारी दिल्या परंतु काही कार्यवाही झाली नाही.

सध्या मनिष कलेक्शन चितळे रोड पासून लक्ष्मीबाई कारंजा या भुयारी गटारीचे व रस्त्याचे काम चालू आहे.चितळेरोड पोलिस चौकी समोरील बंद गटारीला बाय पास करून काम चालु असलेल्या भुयारी गटारीस जोडल्यास अनेक वर्षांपासून प्रलंबित असणार प्रश्न सुटेल व काही अडचण येणार नाही तरी आपण या सामाजिक व महत्वाच्या विषयामध्ये लक्ष घालून कार्यवाही करावी अशी विनंती मनपाला लेखी निवेदनाद्वारे विनायक गोड,सचिन बिमन, तुलसीराम पालीवाल, विश्वजित राठोड(परदेशी), सागर लोखंडे, युनूस शेख, सतीश बत्तीनं,किशोर चोपडा, गोपाळ बागेरा, एस राज टेलर्स,एम आर टेलर्स,मोहन साठे आदींनी केली आहे.

## स.पो.नि. जाकीर शेख यांना ‘अति उत्कृष्ट सेवा’ पदक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** पोलीस दलात तब्बल ३५ वर्षे निष्कलंक, प्रामाणिक आणि उल्लेखनीय सेवा बजावणारे सहाय्यक पोलीस निरीक्षक (–झख) जाकीर चांदमिया शेख यांना भारत सरकारच्या गृह मंत्रालयाकडून ‘अति उत्कृष्ट सेवा पदक’ जाहीर करण्यात आले आहे. या सन्मानामुळे अहिल्यानगर पोलीस दलात त्यांच्या कार्याचा गौरव झाला आहे.

शेख यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील कोतवाली पोलीस ठाणे, नगर तालुका पोलीस ठाणे, स्थानिक गुन्हे शाखा तसेच दहशतवाद विरोधी पथक (महाराष्ट्र राज्य) येथे विविध जबाबदाऱ्या सांभाळताना उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या उत्कृष्ट सेवेमुळे यापूर्वी २०१९ मध्ये त्यांना पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्हही प्राप्त झाले आहे.

पोलीस सेवेत ३५ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी प्रामाणिकपणे कर्तव्य बजावत तब्बल २७५ बक्षिसे मिळविली आहेत. सन २०२४ पासून मुंबई येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असतानाही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मुंबई शहर पोलीस आयुक्तांकडून त्यांना प्रशंसापत्र देऊन गौरविण्यात आले आहे.

दरम्यान, त्यांची नुकतीच अहिल्यानगर येथे राज्य गुप्त वार्ता विभागात बदली झाली आहे. प्रदीर्घ सेवाकाळातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत केंद्र सरकारकडून मिळालेल्या ‘अति उत्कृष्ट सेवा पदका’मुळे सहकारी अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## रुग्णाला केवळ उपचारच नव्हे तर मानसिक समाधान आणि आत्मविश्वास मिळतो : साधना गुगळे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित आचार्य श्री आनंद ऋषीजी हॉस्पिटल येथे श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२६व्या जन्मदिनानिमित्त व स्व.कमलबाई सुवालालजी गुगळे व स्व सुवालाल बन्सीलाल गुगळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ अभय अजित गुगळे ( एस .बी.जी.ट्रेडर्स ) यांच्या वतीने आयोजित किडनी विकार तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उदघाटन उदयोजक अभय गुगळे व अजित गुगळे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सौ साधना गुगळे ,सौ कल्पना गुगळे ,सीए सोहन गुगळे ,रोहन गुगळे ,सौ सारिका गुगळे ,श्रद्धा गुगळे ,रोनक गुगळे,लक्ष्मी गुगळे,श्रुती गांधी ,हर्षल गुगळे ,अभिजित गांधी ,अभिजित भळगट ,निखिलेंद्र लोढा ,डॉ वसंत कटारिया ,सतीश लोढा ,माणकचंद कटारिया ,डॉ आशिष भंडारी , तज्ज्ञ डॉ गोविंद कासट ,डॉ प्राजक्ता पारधे आदीं उपस्थित होते.

यावेळी बोलताना सौ साधना गुगळे म्हणाल्या कि श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या उदात्त शिकवणुकीतून पेरीत होऊन आनंदऋषीजी हॉस्पिटलने गेल्या अनेक वर्षांपासून आरोग्य सेवेचे एक पवित्र कार्य आपल्या खांद्यावर घेतले आहे .हे केवळ एक हॉस्पिटल नसून जिथे प्रत्येक रुग्णाला केवळ उपचारच नव्हे तर मानसिक समाधान आणि आत्मविश्वास मिळतो .आज आमच्या गुगळे परिवारास शिबिराच्या माध्यमातून या ठिकाणी सेवा करण्याची संधी मिळाली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते तसेच येथे पाऊल टाकणारा प्रत्येक रुग्ण हा बरा होऊन आनंदी मनाने आणि समाधानाच्या भावनेने घरी परततो,या हॉस्पिटलची आणखी एक खासियत म्हणजे राज्यातील सर्वात मोठे डायलेसिस विभाग या ठिकाणी कार्यरत आहे.नामंकित अनुभवी डॉक्टर येथे आपली सेवा देतात. रुग्णाच्या आजाराचे सखोल निदान करून योग्य मार्गदर्शन ,औषधोपचार आणि आवश्यक तेव्हा अत्यानुधिक शस्त्रक्रिया कर्णयात करण्यात येतात .यामुळे रुग्णामध्ये या हॉस्पिटलविषयी अधिक विश्वास वाढत जातो, असे प्रतिपादन साधना गुगळे यांनी केले

प्रास्ताविकात निखिलेंद्र लोढा व डॉ. वसंत कटारिया यांनी केले. यावेळी डॉ.गोविंद कासट यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ आशिष भंडारी यांनी सूत्रसंचालन केले तर आभार सतीश लोढा यांनी मानले यावेळी ११० रुग्णाची तपासणी या शिबिरमध्ये करण्यात आली

### देशभक्तीच्या रंगात रंगले जय मल्हार विद्यालय

**नगर तालुका :** जय मल्हार विद्यालय पिंपळगाव रोठा, तालुका पारनेर या विद्यालयामध्ये ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाला. यावेळी जय मल्हार शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव ॲड.पांडुरंग गायकवाड, संस्था पदाधिकारी, पालक, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी,मुंबईकर, पुणेकर उपस्थित होते.

सकाळी विद्यालयाचे ध्वजारोह पिंपळगावचे सुपुत्र, माजी पी.एस. आय मुंबई बाबाजी विठ्ठल जगताप यांच्या हस्ते संपन्न होऊन कार्यक्रमाची सुरवात झाली. प्रभातफेरी,ग्रामपंचायत,सेवा सहकारी सोसायटी,एडीसीसी बँक, यांचा संयुक्त ध्वजारोहण मुख्य चौकात संपन्न झाला. शिक्षक गरकळ सर यांनी सर्व ग्रामस्थ सर्व विद्यालयातील विद्यार्थी यांना व्यसनमुक्ततेची व साक्षरतेची शपथ दिली.नंतर विद्यार्थी विद्यालयांमध्ये दाखल झाले.ॲड. पांडुरंग गायकवाड यांच्या हस्ते बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला.

पी.एस.आय. बाबाजी जगताप यांनी विद्यालयाला लेझीम साहित्य संच व शैक्षणिक साहित्य दिले.

## मिरी ग्रामपंचायतीमध्ये भ्रष्टाचार; चौकशीची मागणी



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** मिरी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गेल्या काही वर्षांत विविध योजनांमधून विकासकामे केल्याचे दाखवून लाखो रुपयांची बिले काढण्यात आली आहेत. मात्र, अनेक कामे प्रत्यक्षात झाली नसून काही कामे अपूर्ण, तर काहींचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून या कामामध्ये ग्रामपंचायतच्या पदाधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्या उज्वला जालिंदर गवळी यांनी केला आहे. या सर्व कामांची चौकशी करण्याची मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

मिरी गाव गेल्या पाच वर्षांपासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करत आहे. साडेचार कोटींची पाणीपुरवठा योजना होऊनही तीन-तीन आठवडे पाणी मिळत नसल्याने ग्रामस्थ त्रस्त आहेत. माहितीच्या अधिकारातून मिळालेली माहिती व ऑनलाइन कामांची पाहणी केली असता पाणीपुरवठा, गटारी, महिला व बालकल्याण, स्वच्छ व आरोचे पाणी आदी योजनांतील कामांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून कामे केलेल्या जेसीबी मालकांचे बील ही देण्यात आली नसल्याचे गवळी यांनी सांगितले.

पंधराव्या वित्त आयोगातून मिळालेल्या लाखो रुपयांच्या निधीचा योग्य वापर झाला नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. ग्रामपंचायतीच्या सर्व कामांची स्वतंत्र चौकशी समितीमार्फत चौकशी करून समितीने प्रत्यक्ष स्थळपाहणी करावी व अहवाल द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

**साठ लाखांचा तलाव गायब?’**

चौदाव्या वित्त आयोगातून मच्छ तलाव बांधण्यासाठी व त्यात मासे सोडण्यासाठी सुमारे साठ लाखांचा निधी २०२० मध्ये खर्च झाल्याचे सांगितले जाते. मात्र, तलाव कुठे व कधी झाला, याची माहिती ग्रामस्थांना नसल्याचा आरोप आहे. त्यामुळे कागदोपत्री निधी खर्च झाला, पण तलाव व मासे मात्र ‘गायब’ असल्याची चर्चा ग्रामस्थांमधुन आहे.

**चौकशी न झाल्यास रास्ता रोको**

पंधरा दिवसांत चौकशी सुरू न झाल्यास मिरी येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्त्या उज्वला गवळी, माजी सरपंच संतोष शिंदे व ज्येष्ठ नेते राजू मामा तागड यांनी दिला आहे.

## शालार्थ ई-केवायसीसाठी मुदतवाढ द्या; शिक्षक भारतीची मागणी

### तांत्रिक अडचणी दूर करून शिक्षकांचे वेतन वेळेवर करा : सुनील गाडगे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राज्यातील शिक्षकांना शालार्थ वेतन प्रणालीद्वारे वेतन मिळण्यासाठी ई-केवायसी पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करताना शिक्षकांना विविध तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ द्यावी आणि तांत्रिक अडचणी तातडीने दूर कराव्यात, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण आयुक्तांकडे करण्यात आली अशी माहिती शिक्षक नेते तथा शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी दिली.

शालार्थ प्रणालीवर ई-केवायसी करताना सर्व्हरची अडचण, माहिती अपडेट न होणे, आधार व इतर कागदपत्रांशी संबंधित अडथळे यामुळे अनेक शिक्षकांची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्यामुळे तांत्रिक अडचणींमुळे कोणत्याही शिक्षकाचे वेतन रखडू नये, यासाठी शिक्षण विभागाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी संघटनेने केली आहे.

शिक्षक नेते तथा शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे म्हणाले, शिक्षकांची कोणतीही चूक नसताना तांत्रिक अडचणींमुळे त्यांचे वेतन थांबणे योग्य नाही. ई-केवायसी प्रक्रिया सुलभ करून शिक्षकांना ती पूर्ण करण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा. शिक्षण विभागाने तांत्रिक अडचणींचे तातडीने निराकरण करून ई-केवायसीची मुदत वाढवावी.

ते पुढे म्हणाले, शिक्षकांना अध्यापनाच्या कामासोबत विविध ऑनलाइन प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. त्यामुळे संबंधित प्रणाली सुरळीत असणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. ई-केवायसीच्या प्रक्रियेमुळे शिक्षकांना अनावश्यक मानसिक त्रास होऊ नये आणि त्यांच्या वेतनावर कोणताही परिणाम होऊ नये, याची दक्षता शिक्षण विभागाने घ्यावी.

या मागणीसाठी शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, जिल्हा सचिव विजय कराळे, जिल्हा कार्याध्यक्ष संजय पवार, पुणे विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, कार्यवाह संजय भुसारी यांच्यासह कैलास जाधव, योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सचिन शेलार, सुदाम दिघे, मोहंमद समी शेख, रामराव काळे, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संतोष देशमुख, किसन सोनवणे, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, विभावरी रोकडे, मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुंज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर तसेच विनाअनुदानित राज्याध्यक्ष रूपाली कुरूमकर आदी उपस्थित होते.

ई-केवायसीसाठी मुदतवाढ देऊन तांत्रिक अडचणी तातडीने सोडवाव्यात आणि शिक्षकांचे वेतन वेळेवर मिळेल, याची व्यवस्था करावी, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेने केली आहे.

## दखल

### शिष्यवृत्ती परीक्षेत भोरच्या अलिजा आतारला घवघवीत यश



**विक्रम शिंदे /भोर :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता चौथी फेब्रुवारी २०२६ चा अंतिम निकाल जाहीर झाला असून भोर येथील अलिझा गुलनाझ इम्रान आतार २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता ४ ती शिष्यवृत्ती परीक्षेत भोर तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावत घवघवीत यश मिळविले.अलिजा हिचे पहिली ते तिसरी पर्यंतचे शिक्षण सीबीएससी पॅटर्न मध्ये बारामती येथील विद्या प्रतिष्ठान संचलित सायरस पुनावाला या विद्यालयात झाले असून तिने चौथीत मराठी माध्यमातून परीक्षा देऊन हे यश संपादन केल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.सद्या ती उत्रोली (ता. भोर )येथील जिल्हा परिषद शाळेत शिकत आहे.गटशिक्षणाधिकारी सचिन लोखंडे, केंद्रप्रमुख अंजना वाडकर,हेमलता काळे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापिका सविता चोरघे,शिक्षिका वैशाली चिंचकर,विठ्ठल दानवले,अमर उभे यांनी तिला वेळोवेळी मार्गदर्शन केले.पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रणजीत शिवतरे,निवृत्त पोलीस निरीक्षक सीआयडी क्राईम ब्रँच पुणे जमीर आतार,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रुपेश शिवतरे, इम्रान आतार, अस्लम आतार यांनी अभिनंदन केले.

### कॉलेज ऑफ फार्मसी, भोर मध्ये 'नशा मुक्त भारत अभियान'




**विक्रम शिंदे /भोर :** भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर राजगड ज्ञानपीठ कॉलेज ऑफ फार्मसी, भोर येथे (दि. १४) रोजी 'नशा मुक्त भारत अभियान' उत्साहात संपन्न झाले. विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने 'नशा मुक्त भारत' प्रतिज्ञा तसेच पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजकुमार शेटे म्हणाले, युवकांनी आपले जीवन व्यसनमुक्त ठेवून राष्ट्राच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे. व्यसनमुक्त युवक हीच भारताची खरी शक्ती असून विकसित भारताच्या निर्मितीसाठी त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या अभियानाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. यावेळी राजगड ज्ञानपीठाचे अध्यक्ष मा. संग्रामदादा थोपटे तसेच मानद सचिवा सौ. स्वरुपा थोपटे यांनी विद्यार्थ्यांनी सामाजिक जाणीव जपत व्यसनमुक्त भारताच्या संकल्पनेला दिलेल्या प्रतिसादाचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

### ज्ञानेश्वर बालक मंदिरातील २०० विद्यार्थ्यांना



### शैक्षणिक साहित्याचे वाटप

**आळंदी देवाची :** श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर बालक मंदिरातील विद्यार्थ्यांना पुष्पक स्टील, अल्का ग्रुपच्या कटारिया परिवाराच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी २०० विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, स्केच पेन व रंगीत खडूचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. मुख्याध्यापक प्रदीप काळे यांनी प्रास्ताविकात कटारिया परिवाराच्या दातृत्वाची तसेच संस्थेला यापूर्वी केलेल्या मदतीची माहिती देत उपक्रमाचा उद्देश स्पष्ट केला.

रूषभ राजेश कटारिया यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शैक्षणिक प्रगतीसाठी प्रोत्साहन दिले. यावेळी संस्था अध्यक्ष सुरेश वडगावकर, सचिव अजित वडगावकर, जैन स्थानकवासी संघ आळंदी देवाचीचे विश्वस्त सागर बागमार, मुख्याध्यापक प्रदीप काळे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वर्षा काळे, प्रतिभा भालेराव, गजानन राठोड, गीतांजली मोरस्कर, सारिका कुटे, सारिका शिंदे, रूपाली उंबरकर व अर्चना रंधवे यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन व आभार राहुल चव्हाण यांनी मानले.

# महा वॉकेथॉनमधून जलसंधारणाचा संदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** शाश्वत विकासासाठी मृदसंधारण आणि जलसंधारणाचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येणार असून, 'सेव्ह सॉईल, सेव्ह वॉटर, सिक्युअर टुमॉरो' ही या उपक्रमाची थीम आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा' हे घोषवाक्य देण्यात आले आहे.

माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट रोजी राज्यभर जलसंधारण दिन साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त १५ ते २१ ऑगस्टदरम्यान 'जलसंधारण सप्ताह', तर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येत आहे.मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी जलसंवर्धनाला लोकचळवळीचे स्वरूप देण्यासाठी राज्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

**क्यूआर कोडद्वारे नोंदणी**

**महा वॉकेथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी क्यूआर कोड आधारित ऑनलाइन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सहभागी प्रत्येक व्यक्तीस ई-प्रमाणपत्र देण्यात येणार असून जिल्हास्तरावर प्रथम दहा विजेत्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. सोशल मीडियावर MahaWalkathon, Walk For Water Save Soil Save Water हे हॅशटॅग वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

तीन किलोमीटरपर्यंत चालणार वॉकेथॉन

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जास्तीत जास्त तीन किलोमीटरचे वॉकेथॉन आयोजित करून सहभागींकडून मृद व जलसंधारणाची शपथ घेण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय मृद व जलसंधारण समितीचे अध्यक्ष काम पाहणार आहेत. राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रम मुंबई येथे होणार आहे.

या उपक्रमात लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, निमशासकीय कर्मचारी, डॉक्टर, कलाकार, उद्योजक, खेळाडू, विद्यार्थी, एनसीसी, एनएसएस, माय भारत, नेहरू युवा केंद्र, भारत स्काऊट्स अँड गाईड्स, रेड क्रॉस, होमगार्ड, स्वयंसेवी संस्था, रोटरी व लायन्स क्लब, रनिंग व सायकलिंग क्लब, उद्योग व व्यापारी संघटना, सीएसआर भागीदार कंपन्या तसेच महिला व नागरिकांना सहभागी करून घेण्यात येणार आहे.

# शिरदाळे येथे भटक्या कुत्र्यांचा धुमाकूळ

## माय-लेकावर हल्ला : प्रसंगावधान राखल्याने चिमुकला बचावला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यातील शिरदाळे येथे भटक्या कुत्र्यांच्या कळपाने माय-लेकावर हल्ला केल्याची घटना शुक्रवारी सकाळी ( दि.१४) रोजी घडली. या हल्ल्यात रुपाली उत्तम रणपिसे आणि त्यांचा मुलगा शिवम उत्तम रणपिसे जखमी झाले आहेत. या घटनेमुळे गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

नेहमी प्रमाणे रुपाली रणपिसे या मुलगा शिवम याच्यासह गोठ्यावर दूध काढण्यासाठी जात असताना रस्त्यात आठ ते दहा भटक्या कुत्र्यांचा कळप बसलेला होता. अचानक कुत्र्यांनी शिवमवर हल्ला केला. त्यावेळी आई रुपाली यांनी प्रसंगावधान राखत मुलाला उचलून सुरक्षित बाजूला ढकलले. त्यानंतर कुत्र्यांनी रुपाली रणपिसे यांच्यावर हल्ला करून त्यांच्या शरीराच्या विविध भागांवर चावे घेतले.

रुपाली यांनी आरडाओरड केल्यानंतर जवळच असलेले कांताराम तांबे यांनी धावत येऊन कुत्र्यांना हुसकावून लावले. मात्र, तोपर्यंत कुत्र्यांनी रुपाली यांना गंभीररीत्या जखमी केले होते.

शिरदाळे परिसरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून गावातील लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गावातील स्थानिक कुत्रे तसेच बाहेरून आलेल्या कुत्र्यांमध्ये वारंवार संघर्ष होत असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे ग्राम स्थांनी सांगितले.

या घटनेची गंभीर दखल घेऊन भटक्या कुत्र्यांवर तातडीने योग्य ती कार्यवाही करून त्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शिरदाळे ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच ज्या नागरिकांकडे पाळीव कुत्रे आहेत, त्यांनी त्यांना जबाबदारीने बांधून ठेवावे आणि त्यांचा त्रास इतर ग्रामस्थांना होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

**भटक्या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करा**

**भटक्या कुत्र्यांचा नाहक त्रास ग्रामस्थांना सहन करावा लागत आहे. आजच्या हल्ल्यात लहान बाळ थोडक्यात बचावले. मात्र, असे प्रकार वारंवार घडत राहिले तर भविष्यात एखाद्याच्या जीवावर बेतण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणेने भटक्या कुत्र्यांचा योग्य बंदोबस्त करणे गरजेचे आहे. तसेच पाळीव कुत्रे असलेल्या नागरिकांनीही त्यांना बांधून ठेवून जबाबदारीने काळजी घ्यावी.**

**– मयूर सरडे,**
**माजी उपसरपंच, शिरदाळे,**
**ता. आंबेगाव जिल्हा पुणे.**

# जेजुरीत जनसेवा आणि पत्रकारितेचा गौरव

## योगेश जगताप, आसिफ मुजावर यांना आदर्श पुरस्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जेजुरी :** जेजुरी नगरपरिषदेचे नगरसेवक योगेश रोहिदास जगताप यांना सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत 'दादा फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य' यांच्या वतीने 'आदर्श नगरसेवक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल आसिफ इब्राहिम मुजावर यांनाही 'आदर्श पत्रकारिता पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी जेजुरी नगरपरिषद येथे हा पुरस्कार वितरण कार्यक्रम पार पडला.

योगेश जगताप हे जेजुरी नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक १ चे नगरसेवक म्हणून कार्यरत आहेत. नागरिकांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणे, सार्वजनिक कामांमध्ये सक्रिय सहभाग घेणे तसेच सामाजिक उपक्रमांमध्ये योगदान देणे, या कार्याची दखल घेत त्यांची 'आदर्श नगरसेवक' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.यावेळी बोलताना जगताप यांनी सांगितले की, जेजुरी शहराच्या विकासासोबतच नागरिकांच्या विविध अडचणी सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारीने काम करण्याचा प्रयत्न आहे. मिळालेला पुरस्कार हा पुढील काळात अधिक जोमाने सामाजिक व सार्वजनिक कार्य करण्यासाठी प्रेरणा देणारा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, पत्रकारिता क्षेत्रात सामाजिक प्रश्न, स्थानिक घडामोडी आणि जनहिताच्या विषयांना सातत्याने प्रसिद्धी देत योगदान देणारे आसिफ इब्राहिम मुजावर यांनाही 'आदर्श पत्रकारिता पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीपभैय्या बारभाई आणि उपनगराध्यक्ष गणेश निकुडे यांच्या हस्ते योगेश जगताप व आसिफ मुजावर यांना सन्मानचिन्ह व पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी नगरसेवक स्वप्नील हरपळे, शिवाजी जगताप, रोहित खोमणे, अस्लम पानसरे, अभिजित कुदळे, कृष्णा कुदळे, नगरसेविका भक्ती कोरपड, नीलम सातभाई, मोनिका घाडगे, प्रज्ञा राऊत, मंदा बयास, मेघा उबाळे, स्नेहल भालेराव, योगिता दोडके, स्वरूपा खोमणे, दादा फाउंडेशनचे अध्यक्ष यशवंत दोडके, शिवराज झगडे, उपाध्यक्ष रमेश लेंडे, तसेच सुशील राऊत, राजू पानसरे, गौतम भालेराव, सत्यवान उबाळे, रमेश बयास, वैभव कोरपड,आकाश भोईटे, संतोष खोमणे, उन्मेष बारभाई आदींसह जेजुरीकर ग्रामस्थ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भोर येथे राष्ट्रध्वज सन्मान राखा मोहीम

## प्रशासन आणि महाविद्यालयांमध्ये निवेदन देऊन व्यापक मोहीम

विक्रम शिंदे । राष्ट्र सह्याद्री

**भोर :** राष्ट्रध्वज म्हणजे राष्ट्राची अस्मिता.१५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या दिवशी राष्ट्रध्वज मोठ्या अभिमानाने फडकवले जातात; मात्र नंतर तेच राष्ट्रध्वज रस्त्यावर, कचरापेटीत किंवा गटारात फाटलेल्या अवस्थेत आढळतात. विशेषतः प्लॅस्टिकचे ध्वज विघटनशील नसल्याने ही विटंबना अनेक दिवस पहावी लागते. ही विटंबना रोखण्यासाठी हिंदु जनजागृती समितीने मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका (क्र. १०३/२०११) दाखल केली होती. तिच्या सुनावणीत न्यायालयाने प्लॅस्टिकच्या



राष्ट्रध्वजांद्वारे होणारा अवमान रोखण्यासाठी शासनाला निर्देश दिले आहेत. त्यानुसार शिक्षण विभागानेही परिपत्रके काढली आहेत. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात देशभक्तांनी हातातील राष्ट्रध्वज जमिनीवर पडू नये यासाठी लाठ्या खाल्ल्या, प्रसंगी प्राणांचे बलीदान दिले. असे असतांना मुलांना खेळण्यासाठी घेतलेले, वाहनांवर लावलेले कागदी आणि प्लॅस्टिकचे ध्वज नंतर रस्त्यावर पडलेले दिसतात. हा क्रांतिकारकांच्या बलीदानाचा अवमानच आहे. काही जण तिरंग्याप्रमाणे स्वतः चा चेहरा आणि शरीर रंगवतात किंवा राष्ट्रध्वजाच्या रंगाचे कपडे घालतात, यातूनही अनावधाने राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. हे टाळण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मनावर राष्ट्रध्वजाचा सन्मान करण्याचे महत्त्व आताच बिंबवणे आणि त्यांचे प्रबोधन तसेच भावी पिढी राष्ट्राभिमानी व्हावी, या उदात्त हेतूने समिती गेली दोन दशकांहून अधिक काळ 'राष्ट्रध्वजाचा सन्मान राखा !' हा उपक्रम राबवत आहे. या अंतर्गत भोर मधील नायब तहसीलदार अरुण कदम यांना आणि शहरातील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल, गर्ल्स हायस्कूल, जिजामाता विद्यालय,राष्ट्रसंत गाडगे महाराज शाळा, महाराणा प्रताप शाळा येथे हिंदु जनजागृती समितीच्या वतीने निवेदने देण्यात आली तसेच हस्तपत्रके, भित्तीपत्रके यांद्वारे देखील जनजागृती करण्यात आली.

# १६ आस्थापनांचे परवाने, नोंदणी निलंबित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** अन्न सुरक्षा, स्वच्छता आणि अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या हॉटेल, रेस्टॉरंट, ई-कॉमर्स आणि डेअरी आस्थापनांविरुद्ध अन्न व औषध प्रशासनाने विशेष मोहीम राबवून कारवाई केली. दि. ११ ते १४ ऑगस्टदरम्यान पुणे विभागात करण्यात आलेल्या तपासणीत अस्वच्छता आणि नियमांचे उल्लंघन आढळल्याने १६ आस्थापनांचे परवाने अथवा नोंदणी निलंबित करण्यात आल्या आहेत.

**शाळांभोवती जंक फूड विक्रीवर सोमवारपासून कारवाई**

अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या 'सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र' मोहिमेंतर्गत ही कारवाई करण्यात आली. हॉटेल व रेस्टॉरंट विभागात फॉर्च्यून एंटरप्रायझेस (हॉटेल सयाजी), हॉटेल चूल मटण, सिम्पली साऊथ, हॉटेल पवन, राजेश चायनीज, जेबीएम हॉस्पिटॅलिटी (कॅन्टीन), बर्गर किंग, डॉमिनोज पिझ्झा आणि पिझ्झा हट या आस्थापनांवर कारवाई झाली. यापैकी जेबीएम हॉस्पिटॅलिटी (कॅन्टीन) विना परवाना व्यवसाय करत असल्याने व्यवसाय बंद करण्याचे निर्देश देण्यात आले.

ई-कॉमर्स क्षेत्रातील झेप्टो लिमिटेड, स्विन्स्टा ईएनटी प्रायव्हेट लिमिटेड आणि ब्लिंक कॉमर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या पुण्यातील आस्थापनांवरही कारवाई करण्यात आली. तसेच ओम साई राम मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट्स, धर्मनाथ दूध शीतकरण केंद्र आणि आर. के. मिल्क या डेअरी आस्थापनांवर कारवाई झाली.

शाळांच्या ५० मीटर परिसरात जंक फूड विक्रीवर कारवाई,:

दरम्यान, शाळांच्या ५० मीटर परिसरात हाय फॅट, हाय शुगर, हाय सॉल्ट (एचएफएसएस) अर्थात जंक फूड पदार्थांची विक्री करणाऱ्यांविरुद्ध सोमवारपासून विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. शाळांच्या ५० मीटर परिसरात अशा पदार्थांच्या विक्रीस प्रतिबंध असल्याने संबंधित व्यावसायिकांनी नियमांचे पालन करावे. उल्लंघन आढळल्यास अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा अन्न व औषध प्रशासन, पुणे विभागाचे सह आयुक्त (अन्न) दि. वा. भोगावडे यांनी दिला आहे. अन्न पदार्थांच्या दर्जाबाबत किंवा स्वच्छतेबाबत तक्रार असल्यास ग्राहकांनी अन्न व औषध प्रशासनाच्या १८००२२२३६५ या टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवावी.

# आळंदी नगरपरिषदेत उत्साहात स्वातंत्र्य दिन साजरा

## गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार; सायकल रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** भारताचा ८०वा स्वातंत्र्य दिन आळंदी नगरपरिषदेत विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. नगरपरिषद पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. स्वातंत्र्य दिनानिमित्त सकाळी ७.३० वाजता महाद्वार येथे यात्रा सभापती पूजा घुंडरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर सकाळी ७.४० वाजता पाणीपुरवठा विभागाच्या सभापती तथा उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.

सकाळी ८.१५ वाजता आळंदी नगरपरिषद कार्यालयाच्या परिसरात नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्या उपस्थितीत मुख्य स्वातंत्र्य दिन सोहळा पार पडला. यावेळी इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.यामध्ये समृद्धी गजानन नरवडे हिने ३०० पैकी २६० गुण मिळवत प्रथम, सोहम किरण कुसमडे याने २२६ गुण मिळवत द्वितीय, ज्ञानेश्वर कृष्णा पितळे याने २१८ गुण मिळवत तृतीय, तर समाधान कुकर याने २०६ गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून प्रत्येकी एक हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक महेश एकनाथ नेहरे आणि जयश्री महेश नेहरे यांचाही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशामध्ये शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची मेहनत यांचा महत्त्वपूर्ण वाटा असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# इंदापूरातील १६ हॉस्पिटलची नोंदणी संशयाच्या भोवऱ्यात; चौकशीचे आदेश

## जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांना सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश; शैक्षणिक पात्रता, नोंदणी कागदपत्रांची पडताळणी होणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

बारामती : इंदापूर तालुक्यातील ग्रामीण भागात सुरू असलेल्या १६ रुग्णालयांच्या नोंदणी अथवा नूतनीकरणाच्या प्रक्रियेबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर जिल्हा आरोग्य विभागाने गंभीर दखल घेतली आहे. या सर्व रुग्णालयांची चौकशी करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे यांनी तालुका वैद्यकीय अधिकारी, पंचायत समिती इंदापूर यांना दिले आहेत. संबंधित चौकशीचा अहवाल सात दिवसांत सादर करण्याचे निर्देश पत्रातून देण्यात आले आहेत.

सुधाकर तुकाराम बोराटे यांनी १३ ऑगस्ट २०२६ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा आरोग्य विभागाने ही कार्यवाही केली आहे. तक्रारीनुसार, इंदापूर तालुक्यातील काही रुग्णालये आवश्यक नोंदणी/ नूतनीकरणाशिवाय सुरू असल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित रुग्णालयांची नोंदणीची स्थिती, कागदपत्रे आणि अन्य आवश्यक बाबींची पडताळणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या १६ रुग्णालयांची होणार चौकशी.

जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या पत्रात नमूद करण्यात आलेल्या रुग्णालयांमध्ये डॉ. सुरज जालिंदर काळे यांचे काळे क्लिनिक अँड अपघात हॉस्पिटल, पळसदेव; डॉ. श्रुती भारत नेलेकर यांचे श्री निळकंठेश्वर आयसीयू व मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल; डॉ. अनुराधा वसंत कांडळकर यांचे केअर अँड क्युअर मॅटरनिटी क्लिनिक, कळंब; डॉ. सचिन पांडुरंग वायसे यांचे वायसे हॉस्पिटल लासुर्णे,; डॉ. महेश गोपीचंद घोळवे यांचे घोळवे हॉस्पिटल, भवानीनगर; डॉ. वसंत भगवान दगडे यांचे सुयश मॅटर्निटी व सर्जिकल नर्सिंग होम, वालचंदनगर; तसेच डॉ. माधवराव जयसिंहराव नाईकनिंबाळकर यांचे नाईकनिंबाळकर हॉस्पिटल, भिगवण यांचा समावेश आहे. याशिवाय डॉ.अक्षय चंद्रकांत कविश्वर यांचे आशा नर्सिंग होम; डॉ. नितीन सोपान लोंढे यांचे संजीवनी ॲक्सिडेंट हॉस्पिटल, वालचंदनगर; डॉ. भागवत दादा जाधव यांचे साई क्रिटिकेअर हॉस्पिटल, बावडा; डॉ. राजेंद्र रामचंद्र शिंदे यांचे डॉ. शिंदे लहान मुलांचे हॉस्पिटल, वालचंदनगर; डॉ. विकास भरतलाल शहा यांचे शहा मॅटर्निटी अँड सर्जिकल नर्सिंग होम, कळंब-वालचंदनगर; डॉ. जयश्री महावीर गांधी यांचे चैतन्य हॉस्पिटल व मॅटर्निटी होम, भिगवण; डॉ. ज्ञानेश्वर परशुराम रेणुकर यांचे यशोधरा आयसीयू अँड ट्रॉमा सेंटर, भिगवण; डॉ. चंद्रशेखर गोविंद कोकाटे यांचे वरद विनायक मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, लासुर्णे आणि डॉ. इंद्रजित प्रविण दोशी यांचे बावडा मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, बावडा या रुग्णालयांचीही चौकशी होणार आहे.

**आरोग्य विभागाच्या चौकशीकडे लक्ष.**

**या प्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे यांनी तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांना संबंधित सर्व बाबींची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता या १६ रुग्णालयांच्या नोंदणी-नूतनीकरणाची वैधता, उपलब्ध शासकीय कागदपत्रे, संबंधित वैद्यकीय पात्रता आणि नोंदणी प्रक्रियेदरम्यान झालेली पडताळणी याबाबत नेमके काय निष्पन्न होते, याकडे इंदापूर तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.**




आशा नर्सिंग होमच्या शैक्षणिक पात्रतेवरही आक्षेप.

याच तक्रारदाराच्या स्वतंत्र तक्रारीच्या आधारे डॉ. अक्षय चंद्रकांत कविश्वर यांच्या आशा नर्सिंग होम, मौजे कळंब, रोड, ता. इंदापूर यांच्याबाबतही जिल्हा आरोग्य विभागाने चौकशीचे आदेश दिले आहेत. तक्रारीमध्ये डॉ. कविश्वर यांच्या शैक्षणिक पात्रतेसह इतर बाबींवर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.तक्रारीत डॉ. अक्षय चंद्रकांत कविश्वर यांच्या शाळेतील नाव, डीग्री व रजिस्ट्रेशन तसेच इतर शासकीय दस्तऐवजांमधील नोंदींमध्ये तफावत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच राजस्थान विद्यापीठ, जयपूर येथील प्रमाणपत्रावर 'मा. कुलगुरू' यांच्या नावाबाबत तसेच विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या नावांच्या यादीमध्ये संबंधित नाव नसल्याबाबतही तक्रारीत आक्षेप घेण्यात आला आहे.

नोंदणीपूर्वी पात्रतेची पडताळणी झाली का?

आशा नर्सिंग होमची नोंदणी करताना संबंधित डॉक्टरांच्या शैक्षणिक अहर्तेची योग्य पद्धतीने पडताळणी करण्यात आली होती का, याचीही चौकशी करण्याचे निर्देश जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी दिले आहेत. तपासणीदरम्यान कोणतीही अनियमितता आढळल्यास प्रचलित कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली होती.

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

सोमवार दि.१७ ऑगस्ट २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८


# स्वातंत्र्यदिनी जिल्हा पोलीस दलातील ३० पोलीस अधिकारी व अमलदारांचा गौरव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय येथे स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वा.च्या दरम्यान जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या शुभ हस्ते जिल्हा पोलीस दलातील ३० पोलीस अधिकारी व अंमलदार यांना गुणवत्ता पूर्ण सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक, अति उत्कृष्ट सेवा पदक, दीर्घकालीन अतिउत्कृष्ट सेवा पदक प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे,शहर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व इतर वरिष्ठ अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते. तसेच सेवा पदक अधिकारी कर्मचारी यांचे कुटुंबीय उपस्थित होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र व पदक देऊन सन्मानीत करण्यात आले.

यामध्ये पोलीस उपनिरीक्षक संपत मुरलीधर खैरे (सुपा पोस्टे), पोलीस उपनिरीक्षक शैलेश चंद्रकांत उपासने (ना.ह.स), सहायक पोलीस उपनिरीक्षक अन्वरअली सय्यदअली सय्यद (पोलीस मुख्यालय), सहायक पोलीस निरीक्षक हेमंत शिवाजी थोरात प्रभारी अधिकारी (चखऊ पो.स्टे), पोलीस उपनिरीक्षक मनोहर नामदेव शेजवळ (वाचक शाखा), सहायक पोलीस उपनिरीक्षक अन्वरअली सय्यदअली सय्यद (पोलीस मुख्यालय), सहायक पोलीस उपनिरीक्षक संजय जबाजी खंडागळे (पोलीस मुख्यालय), सहायक पोलीस उपनिरीक्षक विजय गोरखनाथ लोंढे (बिनतारी संदेश दळणवळण), पोलीस उपनिरीक्षक किरण भास्कर शेलार (श.वा.शा शिर्डी), सहायक पोलीस उपनिरीक्षक किरण प्रकाश शेलुकर (वाचक शाखा), पोलीस हवालदार सचिन वसंत पवार (वाचक शाखा), पोलीस हवालदार रेहान अजिज शेख (वाचक शाखा), पोलीस हवालदार कृष्णा नाना कुऱ्हे (शिर्डी पोलीस ठाणे), पोलीस हवालदार दिगंबर रावसाहेब कारखिले (आर्थिक गुन्हे शाखा), पोलीस हवालदार रंगानाथ जयराम नरसाळे (मोटार परिवहन विभाग), पोलीस हवालदार मल्लिकार्जुन कैलास बनकर (आर्थिक गुन्हे शाखा), पोलीस हवालदार कृष्णा बबनराव विधाटे (जिल्हा विशेष शाखा), पोलीस हवालदार राजु आप्पासाहेब सुद्रिक (MIDC पो.स्टे), पोलीस हवालदार संदिप कचरु पवार (MIDC पो. स्टे), पोलीस हवालदार संतोष बापुराव ओव्हळ (उविपोअ अहिल्यानगर शहर), पोलीस हवालदार सचिन महादेव जाधव (उविपोअ अहिल्यानगर शहर), पोलीस हवालदार दिपक भास्कर घाटकर (स्थानिक गुन्हे शाखा), पोलीस हवालदार अभिजीत दत्तात्रय अरकल (स्थानिक गुन्हे शाखा), पोलीस हवालदार सुयोग संजय सुपेकर (स्थानिक गुन्हे शाखा), पोलीस हवालदार सुरेश चंद्रकांत माळी (वाचक शाखा), पोलीस हवालदार माधुरी साहेबराव तोडमल (वाचक शाखा), पोलीस हवालदार किर्ती जगन्नाथ कांजवणे (वाचक शाखा), पोलीस हवालदार भाग्यश्री गंगाधर भिटे (स्थानिक गुन्हे शाखा), पोलीस हवालदार राहुल भाऊसाहेब सोळुंके (जिल्हा विशेष शाखा), पोलीस हवालदार अमोल बाबासाहेब घुले (वाचक शाखा) यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले.









































